रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १५२
www.ramprahar.com

बुधवार, १८ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### पहाटे आणि रात्री गारवा, दुपारी मात्र उकाडा

**मुंबई :** सध्या मुंबईकर दुपारच्या उन्हामुळे हैराण झाले आहेत. मागील दोन-तीन दिवसांपासून पहाटे आणि रात्रीच्या वेळी गारवा असला तरी दुपारच्या वेळी उन्हाचा सामना करावा लागत आहे. सांताक्रूझ येथे ३४.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद मंगळवारी (दि. १७) झाली, जे सरासरीपेक्षा काही अंशानी अधिक होते. सांताक्रूझ येथील कमाल तापमान हे सरासरी कमाल तापमानापेक्षा मंगळवारी १.८ अंशानी अधिक होते, तर कुलाबा येथे ३२.५ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. मागील दोन दिवसांपासून पहाटे व रात्री गारवा असला तरी दुपारी मात्र असह्य उकाडा सहन करावा लागत आहे. पुढील दोन-तीन दिवस कमाल तापमानाचा पारा ३० ते ३४ अंश सेल्सिअस दरम्यान असेल तसेच किमान तापमानाचा पारा पुढील काही दिवस १५ ते २० अंशादरम्यान राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे

अंतरंग

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार निरंजन डावखरे/२

खोपोली शीळफाट्यावरील वाहतूक कोंडी फुटेना!/५

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीत भारताने फॉलोऑन टाळला/८

# एक देश, एक निवडणूक! विधेयक लोकसभेत मंजूर

## संयुक्त संसदीय समितीमध्ये होणार सर्वसमावेशक चर्चा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभेत मंगळवारी (दि. १७) एक देश, एक निवडणूक विधेयक सादर करण्यात आले. कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला. या वेळी विधेयकाच्या बाजूने २६९, तर विरोधात १९८ मते पडली. आता हे विधेयक सर्वसमावेशक चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवले जाणार आहे.

याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली होती. कायदामंत्री



अर्जुन मेघवाल यांनी मंगळवारी हे विधेयक लोकसभेत सादर करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. त्यामुळे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यावर मतदान घेतले.

विधेयकावर विरोधी पक्षांच्या निदर्शनांदरम्यान गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, हे विधेयक मंत्रिमंडळात चर्चेसाठी आले तेव्हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ते जेपीसीकडे विचारासाठी पाठवण्याची इच्छा व्यक्त केली होती.

> **एकाचवेळी निवडणुका घेण्यासंदर्भातील प्रस्तावित एक देश, एक निवडणूक विधेयक राज्यांचे अधिकार काढून घेणार नाही. हे विधेयक पूर्णपणे घटनात्मक आहे. विधेयक जेपीसीकडे पाठवण्याची विरोधकांची मागणीही आम्ही मान्य केली आहे.**
> **-अर्जुन मेघवाल, केंद्रीय कायदामंत्री**

नवीन संसद भवनात पहिल्यांदाच मतदान झाल्याने काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. डिजिटल पद्धतीने झालेल्या मतदानात विधेयकाच्या बाजूने २६९, तर विरोधात १४९ मते पडली, पण विरोधकांनी त्यावर आक्षेप घेतल्यानंतर तांत्रिक अडचणी आलेल्या सदस्यांचे पुन्हा चिठ्ठीवर मतदान घेण्यात आले. या वेळी विधेयकाच्या बाजूने २६९, तर विरोधात १९८ मते पडली. यानंतर मेघवाल यांनी हे विधेयक लोकसभेत स्वीकारण्यासाठी सादर केले. अध्यक्षांनी आवाजी मतदान घेतल्यानंतर विधेयकाचा मार्ग मोकळा झाला.

# गोसेवा आयोगाच्या संकेतस्थळाचे मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते अनावरण



**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील गोवंशाचे संवर्धन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या www.mahagosevaayog.org या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १७) नागपूर येथे अनावरण करण्यात आले.

विधानभवनातील समिती सभागृहात संकेतस्थळ अनावरण समारंभ झाला. राज्यामध्ये देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्याकरिता कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात एक कोटी ३९ लाख गोवंश असून त्यामध्ये १३ लाख देशी गायी असल्याची माहिती अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. 'गो टेन' अंतर्गत गो संगोपन, गो संवर्धन, गो संरक्षण, गोमय मुल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक, गोपालक, गो आधारित शेती, गो साक्षरता आणि गो पर्यटन या माध्यमातून गायींच्या संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. राज्यात देशी गायींसाठी विशेष दुग्धशाळा (डेअरी) निर्माण करण्यात येतील, असेही मुंदडा यांनी सांगितले.

आयोगामार्फत देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करणे व त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण केले जात आहे. गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोवंश संस्थांची नोंदणी, गोवर्धन गोवंश सेवा केन्द्र योजना व इतर योजना अंतर्भूत करणे व त्याची अंमलबजावणी करणे, पशुआरोग्य सेवांचे प्रचालन करणे, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती, पशुंची काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण आणि जनजागृती केली जात असून त्याबाबतची माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातून सार्वजनिक करण्यात आली आहे. सर्वसामान्य जनता आणि गोवंश संवर्धन करणाऱ्या संस्थांसाठी या संकेतस्थळाच्या माध्यमातून एका क्लिकवर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

संकेतस्थळाच्या अनावरण समारंभास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गोसेवा आयोगाचे सदस्य सर्वश्री संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय, उद्धव नेरकर, सुनील सूर्यवंशी, सनत कुमार गुप्ता, दीपक भगत आदी उपस्थित होते.



**नागपूर : महाराष्ट्र राज्य विधीमंडळ हिवाळी अधिवेशनाच्या मंगळवारी दुसऱ्या दिवशी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी माजी मंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली आणि विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.**

# रायगड आणि शिवनेरीवर उभारला जाणार भगवा ध्वज

**नागपूर : प्रतिनिधी**

रायगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठा साम्राज्याची राजधानी होता. रायगडावर १६७४ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकही झाला होता, तर शिवरायांचे जन्मस्थान म्हणजे शिवनेरी किल्ला. महाराष्ट्राच्या दृष्टीने हे दोन्ही किल्ले अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दोन्ही किल्ल्यांवर पुरातत्व विभागाची परवानगी घेऊन स्वराज्याचा मोठा भगवा ध्वज उभारला जाणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १७) विधानसभेत दिली.

विधानसभेमध्ये मंत्री गिरीश महाजन यांनी महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्व शास्त्रविषयक स्थळे व अवशेष सुधारणा विधेयक मांडले. या वेळी आमदार आदित्य ठाकरे यांनी प्राचीन स्मारकांचे जतन करावे, अशी मागणी केली. यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. त्यानंतर आमदार शरद सोनवणे म्हणाले, रायगड आणि शिवनेरी किल्ला हे महाराष्ट्राचे दैवत आहेत. जयपूरप्रमाणे किल्ल्यावर राहणाऱ्या लोकांसाठी रोजगार निर्माण करावा तसेच या दोन्ही किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा मोठा भगवा ध्वज लावण्यात यावा. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुरातत्व विभागाची परवानगी घेऊन शिवनेरी आणि रायगड या दोन्ही किल्ल्यांवर स्वराज्याचा मोठा ध्वज लावला जाईल.

## निवडक

### बेकायदा प्रक्षेपण, सट्टेबाजीप्रकरणी ईडीचे छापे; बँकेतील रक्कम गोठवली

**मुंबई :** टी-२० विश्वचषक सामन्यांचे बेकायदा प्रक्षेपण आणि ऑनलाईन सट्टेबाजीप्रकरणी सक्तवसुली संचलनलायाने (ईडी) मुंबई, पुणे व दिल्ली येथील २१ ठिकाणी छापे टाकले. मॅजिकविनप्रकरणी सुरू असलेल्या तपासात ही कारवाई करण्यात आली असून बँक खात्यांमधील ३० लाख रुपये गोठवण्यात आल्याची माहिती ईडीकडून देण्यात आली. चित्रपट कलाकारांनी या सट्टेबाजी संकेतस्थळाची जाहिरात केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

### युपीच्या संभलमध्ये आणखी एक पुरातन मंदिर आढळले

**संभल :** उत्तर प्रदेशातील संभल येथे मुस्लिमबहुल परिसरात अतिक्रमण करून पूर्णपणे झाकण्यात आले प्राचीन मंदिर आढळले. या घटनेची सध्या चर्चा सुरू असताना आता याच परिसरात आणखी एक मंदिर दिसून आले आहे. आजुबाजूला मोठ मोठी घरे बांधल्याने हे मंदिर पूर्णपणे झाकले गेले होते. पोलिसांनी मंदिराचे कुलूप तोडून दरवाजा उघडला असता आत हनुमान आणि राधाकृष्णाच्या मूर्ती आढळल्या.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून व्हिडीओ केला व्हायरल

## कर्जतमधील प्रकार; तरुणाविरोधात गुन्हा

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खांडस येथील एका तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लैंगिक अत्याचार केले आणि त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून सोशल मीडियावर व्हायरल केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याबाबत आता पीडित मुलीच्या कुटुंबियांनी नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेतल्यानंतर आरोपी तरुणावर बाल लैंगिक अत्याचार संरक्षण पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

आरोपी २२ वर्षीय अक्षय दशरथ ऐनकर या तरुणाने गावतीलच १७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत प्रेमाचे नाटक करीत तुझे वय १८ वर्ष पूर्ण झाले की आपण लग्न करू असे सांगितले होते. गेली दोन वर्षे प्रेमाचे नाटक करीत असताना आरोपी अक्षयने पीडित मुलीला मार्च २०२३मध्ये आपल्या घरी तसेच शेजारील बंद घरात कोणीही नसताना भेटण्यासाठी बोलावून बळजबरीने व धमकी देत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतरही वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन लैंगिक अत्याचार केले. अत्याचार करताना आरोपीने आपल्या मोबाईलमध्ये पीडित मुलीचे व्हिडीओ रेकॉर्डिंगदेखील केले होते.

दरम्यान, अक्षय याने आपल्या मोबाईलमधून अल्पवयीन मुलीसोबतचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. ही बाब समोर येताच पीडित मुलीच्या कुटुंबाकडून नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल करण्यात आली. पीडित मुलीने आपली फसवणूक झाल्याचे सांगून तिच्यावर केलेल्या अत्याचाराची माहिती नेरळ पोलिसांना दिली.

याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार संरक्षण पोक्सो अधिनियम २०१२चे कलम ४,६,१४,१५, भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम ६४,६४(२)(आय),(एम), माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (इ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी अक्षयने अन्य काही मुलींचीदेखील फसवणूक केल्याचे बोलले जात आहे असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# खोपोलीत नाकाबंदीमध्ये सापडले पिस्तूल व काडतुसे; त्रिकुट पोलिसांच्या ताब्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

विनापरवाना पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसे जवळ बाळगणाऱ्या अफसर मेहबूब कुरेशी (वय ३९), नझरुद्दीन निजामुद्दीन खान (वय ४८) आणि साजिद लायक कुरेशी (वय ४३, सर्व राहणार कुर्ला, मुंबई) यांना खोपोली पोलिसांनी अटक केली आहे. तीनही आरोपींवर खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तीनही आरोपी त्यांच्याजवळील कारमधून रविवारी पहाटे ४च्या सुमारास मुंबईकडे जात असताना खोपोली पोलीस ठाणे हद्दीत शिळफाटा येथे साई रिव्हर रिसॉर्टसमोर पोलिसांनी अडवले. त्यांची अंगझडती घेतली असता पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसे मिळून आले. यासोबतच पोलिसांनी आरोपींकडून दोन आयफोन, १४ हजार रुपये रोख, पाच लाख रुपये किमतीची कार व दोन मोबाईल असा एकूण सहा लाख ४९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनादरम्यान मंगळवारी (दि. १७) माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. ही सदिच्छा भेट असल्याचे बोलले जात आहे.



विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीला मोठा विजय मिळाला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी मुंबई येथे झाला. या सोहळ्यासाठी माजी मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंनाही निमंत्रण देण्यात आले होते, मात्र ठाकरेंसह विरोधी पक्षातील अनेक नेते शपथविधीला हजर राहिले नाहीत. यानंतर मंगळवारी हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी अनिल परब, आदित्य ठाकरे, वरूण सरदेसाई आणि सचिन अहिर यांच्यासह मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीही भेट घेतली.

मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांची भेट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बातचीत करताना या भेटीबद्दल भाष्य केले. ते म्हणाले, महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेतले जातील, अशी या सरकारकडून अपेक्षा आहे.

### निसर्गरम्य मुरुड



**मुरूड : नारळ-पोफळीची गर्द झाडी, विस्तीर्ण समुद्रकिनारा आणि लाटांचा मारा सहन करीत आजही समुद्रात उभ्या असलेल्या पद्मदुर्ग उर्फ कासा किल्ल्याचे विहंगम दर्शन दत्त टेकडीवरून घडते. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला कासा हा मध्ययुगीन जलदुर्ग आहे, जो येथील सौंदर्य अधिकच वाढवतो.** (छाया : सुधीर नाझरे)

# वय चोरणाऱ्या खेळाडूंवर 'आरडीसीए' करणार कडक कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षात विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूला एका विशिष्ट तारखेनुसार वयाची अट असते व बोन टेस्ट (हाडांची चाचणी)ची पूर्तता करावी लागते, मात्र असे बरेचदा आढळून येते की ज्या वयोगटाची स्पर्धा असते त्यापेक्षा जास्त वयाचे खेळाडू खोटे दाखले व पुरावे तंतोतंत तयार करून स्पर्धेत सहभागी होत असतात. यावर आता रायगड जिल्हा असोसिएशन (आरडीसीए) कडक कारवाई करणार आहे.

काही क्रिकेटपटू आपल्या जन्माची खोटी तारीख तयार करून व वय कमी दाखून कागदपत्रे तयार करून खेळतात, तर काही खोटे आधार कार्ड तयार करून त्यात नाव व वय बदलून आपल्या वयाचा व रहिवासी असल्याचा पुरावा तयार करून खेळतात. एवढ्यावरच न थांबता क्रिकेट स्कोरिंग ॲपमध्ये खऱ्या नावाच्या स्पेलिंगमध्ये बदल करून त्या-त्या क्रिकेट असोसिएशनला हुबेहूब फसवतात. असे कागदपत्रांचे पुरावे अगदी खरे वाटावे असे तयार केल्याने प्रथमदर्शनी त्यावर विश्वास ठेवावा लागतो, पण नंतर त्याची सखोल पडताळणी केल्यावर कागदपत्रे खोटी तयार केली असल्याचे निदर्शनास येते. कहर म्हणजे काही खेळाडू आपल्या लहान भावाच्या नावाने कागदपत्रांमध्ये हेराफेरी करून त्याच्या नावाने खेळत आहेत.

खोटे जन्माचे दाखले, शाळेचे बनावट बोनाफाईड, वय व रहिवासी पत्ता बदलून तयार केलेले आधार कार्ड करण्याचे प्रमाण सर्वत्र वाढत चालले आहे. वय चोरणारे खेळाडू स्वतः ला भविष्यात स्टार क्रिकेटर बनवण्याच्या नादात आपल्यापेक्षा लहान असलेल्या खेळाडूंवर अन्याय करीत असल्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे दिसते.

काही वेळा बोनटेस्टचा रिपोर्टसुद्धा बनावट वा खोटा तयार केलेले आढळून आले आहे. याला आळा बसावा म्हणून आयसीसी, बीसीसीआय, एमसीएपासून ते प्रत्येक जिल्हा क्रिकेट असोसिएशनने बनावट कागदपत्र तयार करणाऱ्या खेळाडूंवर कडक कारवाई करावी, अशी मागणी सर्वत्र होताना दिसते. रायगड जिल्हासुद्धा याला अपवाद नाही. **(पान २ वर..)**

# महामेट्रो-आशियाई बँक यांच्यात करार

## नागपूर शहरासह परिसराचा गतीने विकास होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला चालना देण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून १ हजार ५२७ कोटी रुपयांचे (२०० मिलियन डॉलर) अर्थसहाय्य मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात यासंदर्भात प्रकल्प करार करण्यात आला. या प्रकल्पामुळे नागपूर शहरासह परिसराच्या विकासाला आणखी गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि आशियाई विकास बँकेच्या संचालक मिओ ओका यांनी अर्थसहाय्याच्या करारावर सह्या केल्या. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आशियाई विकास बँक आणि युरोपियन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्याकडून एकूण ३५८६ कोटी रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी १५२७ कोटी रुपये आशियाई विकास बँकेकडून मिळणार असून त्यासंदर्भातील करार करण्यात आला. महामेट्रोला हा वित्तपुरवठा जपानी येन या चलनामध्ये मिळणार आहे. यामुळे कर्जावर तुलनेने कमी व्याज द्यावे लागणार आहे. महामेट्रोला या कर्जाची रक्कम केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून उपलब्ध केली जाणार आहे.

नागपूर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-२ हा खापरी ते एमआयडीसी इएसआर दरम्यान १८.५ किलोमीटर, ऑटोमोटिव्ह स्क्वेअर ते कन्हान नदी दरम्यान १३ किलोमीटर, प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्टनगर दरम्यान ५.६ किलोमीटर आणि लोकमान्यनगर ते हिंगणा दरम्यान ६.७ किलोमीटर असा एकूण ४३.८ किलोमीटरचा असणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा लाभ नागपूर परिसरातील १० लाख रहिवाशांना होणार आहे.

यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव आश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, विविध विभागांचे सचिव, आशियाई विकास बँकेचे विविध विषयतज्ज्ञ यांच्यासह महामेट्रोचे संचालक (एसपी) अनिलकुमार कोकाटे, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे आदी उपस्थित होते.

# लोक अदालतीतून २ हजार ७०१ ग्राहकांच्या प्रकरणांचा निपटारा

**कल्याण : प्रतिनिधी**

तालुकास्तरावर १४ डिसेंबरला आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी २ हजार ७०१ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ६ कोटी २१ लाख रुपयांचा भरणा केला.

कल्याण परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यात २ हजार २७२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ५ कोटी ७० लाख रुपयांचा भरणा झाला. यात कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एकमध्ये ३२२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ८० लाख ६८ हजार रुपयांची वसुली झाली. कल्याण मंडल दोनमध्ये १ हजार १८ प्रकरणे ३ कोटी २४ लाख रुपयांच्या वसुलीने सामोपचाराने मिटवण्यात आली. वसई मंडलात ७९० प्रकरणांच्या निपटाऱ्यातून १ कोटी ५३ लाख रुपयांची वसुली होऊ शकली. तर पालघर मंडल कार्यालयांतर्गत १३ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या १४२ ग्राहकांची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली.

भांडुप परिमंडलातील ठाणे मंडलात १८ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या २६१ ग्राहकांची प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. वाशी मंडल कार्यालयांतर्गत १३५ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ३० लाख रुपयांची वसुली झाली. तर पेण मंडलात तीन लाखांचा भरणा करणाऱ्या ३३ ग्राहकांची प्रकरणे सामोपचाराने मिटवण्यात आली.

ठाणे, रायगड आणि पालघर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने तसेच भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंते, महावितरणच्या विधी विभागाने लोक अदालत यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

# सुदर्शन केमिकल कंपनी अंतर्गत अग्नीसुरक्षा, विविध शासकीय योजना व सुसंवादाचे धडे

**रोहे : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज कंपनी चे साईट हेड विवेक गर्ग व सीआरएस विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनानुसार सशक्त पंचायत सशक्त भारत अंतर्गत महिलांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण संपन्न झाले.



या कार्यक्रमास उमेद तालुका अभियानाच्या रोहा तालुक्यातील एकुण ६६ सीआरपीनी सहभाग नोंदवला. सहभागी झालेल्या प्रतिनिधींना, अग्नीशमन उपकरणांचा योग्य पद्धतीने वापर करणे व अग्नी सुरक्षा जनजागृती अशा विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले तसेच स्वसंरक्षणासाठी सक्षम बनवणे आणि जीवन व मालमत्तेचे संरक्षण करणे असे प्रतिपादन सेफ्टी विभागाचे जितेंद्र पाटील यांनी केले.

पंचायतराजचे तज्ञ दत्ता गुरव यांनी यशस्वी संवाद ही व्यक्तिमत्त्व विकासाची महत्त्वाची कौशल्ये असून त्याद्वारे वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यात यश प्राप्त करता येते सांगितले.

प्रभावी संवादाचे तत्त्वज्ञान, श्रोत्यांना समजून घेणे, सकारात्मक संवाद, भाषाशैली सुधारणा, टीमवर्क आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करण्याच्या पद्धती प्रवक्तेकिशोर काळोखे यांनी पटवून दिल्या.

या कार्यशाळेला उमेद तालुका अभियानचे व्यवस्थापक अक्षय खांदेकर, नेहा पाटील तसेच सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज सीआरएस विभागाचे महेश डेरिया, स्वाती मोहिते व अमर चांदणे व सुधा कॉर्डीनेटर यांचे सहकार्य लाभले.

# कर्जतमध्ये माकडांचा उच्छाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील काही भागात महिनाभरापासून माकडाने उच्छाद मांडला आहे. या यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असुन कर्जत वनविभागाने या मुक्त संचार करणाऱ्या माकडाचा बंदोबस्त करावा अशी मागणी त्या परिसरात वास्तव्य करणाऱ्या प्रशांत उगले यांनी वनविभागाकडे केली आहे .



मागील वर्षी सुद्धा अशाच प्रकारे दोन माकडांनी महावीर पेठ ते शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदी किनारी असलेल्या इमारतींमध्ये तसेच त्यांच्या बाल्कनी मध्ये शिरून वस्तूंची फेकाफेक करणे आदी नुकसान केले होते. नागरिकांनी या माकडांना विरोध केल्यास ते माकड आक्रमक होताना दिसून येत होते. एका माकडाने त्यावेळेस लहान मुलाच्या डोक्यावर हल्ला चढवला होता त्यात तो मुलगा जखमी झाला होता.

यामुळे पुन्हा आत्ता नव्याने आलेले माकडांकडून असे प्रकार तथा घटना घडू नये यासाठी या माकडांना पिंजरा लावून त्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे. वन विभागाने याबाबत योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे प्रशांत उगले यांना सांगितले आहे.

# मोहोपाड्यात १ जानेवारीपासून प्लास्टिकबंदीचा स्तुत्य निर्णय

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

मोहोपाडा ग्रामपंचायतीने (दि.१७) रोजी सर्व व्यापारी रोडवरील छोटे दुकानादार व मोहोपाडा व्यापारी पेठेत रिक्षा फिरवून सर्व लोकांना आपली वाहने मार्केटमध्ये थांबवू नयेत दुकाने रेषेच्या आत असावीत व १ जानेवारीपासुन प्लास्टिक बंदी करण्यात येत आहे असल्याचे जाहिर केले.




यामध्ये सरपंच उमा मुंढे ग्रामविकास अधिकारी कर्मचारी वर्ग व व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष पिंट्या पाटील व अमीत शहा व अन्य सदस्य व सामाजिक कार्यकर्ते विवेक ओक यांनी सर्व व्यापारी दुकानादार विक्राते ग्राहक यांना या रॅलीतून सूचना दिल्या.

यावेळी रस्त्यावर असलेली वाहने व दुकानदार यांच्यावर कारवाई करण्यात येणार अशा सुचना देण्यात आल्या.

मोहोपाडा मेन मार्केट मच्छी बाजार यांना याबाबत सुचना करत अतिक्रमण काढण्यात येणार आहे असे सूचीत करण्यात आले आहे

या बाबतीत १जानेवारी पासून कडक कारवाई करण्यात येणार असुन वाहनांना दंड भरावे लागणार अशा सुचना दिल्या आहेत.

# रायगडात थंडी वाढली; पहाटे धुके

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हवेत धुके व गारवा सुरू झाला असल्याने जोरदार थंडी जाणवत आहे.

गेल्या काही दिवसांत थंडीचा जोर वाढू लागला आहे. मागील महिन्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने वातावरणात असह्य उकाडा जाणवत होता, मात्र गेल्या काही दिवसांत सकाळी थंड हवेचा अनुभव येऊ लागला आहे तसेच धुके दाटत आहे.

पुढील काही दिवसात थंडी वाढेल व गुलाबी थंडीचा अनुभव मिळेल असे जाणकार सांगतात. थंडीचे हवामान कडधान्य शेतीला पूरक असून शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

थंडी व धुके पडत असल्याने हिवाळी दिवसांत सकाळी गार हवेत व्यायाम करणारे नागरीक, विद्यार्थी आवर्जून घराबाहेर पडत असून आनंद घेत आहेत.

# फळरोपवाटिकांचा परवाना रद्द

**रायगड : रामप्रहर वृत्त:**

सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये विभाग स्तरावरून जिल्हानिहाय परवानाधारक खाजगी फळरोपवाटिकांची आंतरजिल्हा तपासणी समितीच्या अहवालामध्ये सर्वसाधारण अभिप्राय- ड निकृष्ट दर्जा असलेल्या फळरोपवाटिकांचा परवाना रद्द करण्यात आला असुन त्यांची नांवे शासनाने जाहीर केली आहेत.



परवाना रद्द करण्याची शिफारस करण्यात आलेल्या परवानाधारक खाजगी फळरोपवाटिकांची यादी, पुढीलप्रमाणे –

सन २०२३-२४ : १.स्नेहल नर्सरी नवेघर ता. अलिबाग २.स्वप्नील नर्सरी आगारकोट ता. अलिबाग, ३.एस पी नर्सरी चोल ता. अलिबाग,४.आशा रोपवाटिका बंडवाडी ता. म्हसळा, ५.कौस्तुफ नर्सरी, मु. आलुफ पो. दांडगुरी, ६.लौकिक नर्सरी, दिवे आगार ता. श्रोवर्धन,७.माही नसेरी, चौल ता. श्रीवर्धन, ८.मानसी रोप वाटिका दिवे आगार ता. श्रीवर्धन ९.पुष्पक रोपवाटिका, श्रीवर्धन, १०.ओम रोपवाटिका दिवे आगार ता. श्रीवर्धन रायगड,

सन २०२४-२५ जिल्हा-रायगड; तपासणी समितीने रद्द केलेल्या फळरोपवाटीकांची नावे

१.राज रोपवाटिका, कोकरे तर्फ नाते, ता. महाड, जि. रायगड, २.ओम रोपवाटिका, कोकरे तर्फे नाते, ता. महाड, जि. रायगड,३.लौकिक रोपवाटिका, दिवेआगार, ता. श्रीवर्धन, नि. रायगड,४.कौस्तुभ रोपवाटिका, आसुफ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड,५.मानसी रोपवाटिका, दिवेआगार, ता. श्रीवर्धन, जि. रायगड,६.ओम रोपवाटिका, दिवेआगार, ता. श्रीवर्धन, जि. रायगड, ७.सात्विक रोपवाटिका, नागळोली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड,८.रामेश्वर फार्म आणि नर्सरी, चंदरगाव, ता. सुधागड-पाली, जि. रायगड,९.जिझा नर्सरी, मोजे पालांबे, ता. अलिबाग, जि. रायगड,

अशा परवाना रद्द केलेल्या/निकृष्ट दर्जा असलेल्या परवानाधारक खाजगी फळरोपवाटिकांवरून कोणत्याही प्रकारची कलमे रोपे यांची उचल/विक्री करण्यात येऊ नये. असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रायगड अलिबाग यांनी कळविले आहे.

# करंजाडेवासीय १२ तास विजेविना

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमधील वीजपुरवठा सोमवारी दुपारी १२ वाजता खंडीत झाल्यानंतर तो मंगळवारी पहाटे एक वाजले पूर्ववत न झाल्याने नागरिकांना तब्बल बारा तासांहून अधिक काळ विजेविना काढावा लागले. करंजाडे वसाहतीला येणारा वीज प्रवाह ओएनजीसी ते भिंगारी अशा वाहिनीव्दारे आला आहे. याच वाहिनीमध्ये बिघाड झाला. नेमका बिघाड कुठे झाला याचा शोध लावण्यासाठी अनेक तास गेले. सायंकाळी उच्चदाबाच्या वीज वाहिनीला दोन ठिकाणी जोडणी द्यायचे काम सुरु झाले. दुसऱ्या दिवशी सेवा सुरू झाली.

# माडप ठाकूरवाडीत नेत्र तपासणी शिबिरासह विविध साहित्य वाटप

**चौक: प्रतिनिधी**

लायन्स क्लब खालापूर, लायन्स क्लब रसायनी(एमआयडीसी) लायन्स क्लब पनवेल व ग्रुप ग्रामपंचायत माडप यांच्या विद्यमाने आणि नायर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबीर, ब्लँकेट व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




खालापूर तालुक्यातील अतीशय दुर्गम भागातील माडप ठाकूर वाडी येथे नेत्र तपासणी शिबीर, ब्लँकेट वाटप व शैक्षणिक साहित्य वाटप केल्याने त्याचा अनेक गरजूंना फायदा झाला. अशा दूर्गम भागात शिबीर आयोजित केल्याने येथील लोकांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले.

अतिशय उंचावर असलेल्या माडप गावच्या दुर्गम भागात ठाकूर समाजाची मोठी वसाहत आहे. अद्यापही तेथे वाहन जात नाही.त्यामुळे येथील लोकांना वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. दुर्गम भागातून जाणे येणे शक्य होत नसल्याने, स्वतः च्या आरोग्यावर लक्ष नसतो,त्यामुळे विविध आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. याची दखल ग्राम पंचायत माडप यांनी घेतली आहे.

आज पनवेल, खालापुर, रसायनी येथील लायन्स क्लबचे अध्यक्ष व सदस्य यानी हे शिबीर आयोजित करून २२३ नेत्र तपासणी करण्यात आली,१५० गरजूंना ब्लँकेट वाटप तर ८० विद्यार्थी यांना दप्तर सह शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी माजी सरपंच हरेश पाटील, सदस्य मंगेश पाटील, नितीन पाटील, यशवंत वाघ यांच्यासह लायन किशोर पाटील,प्रोजेक्ट हेड,लायन भरत पाटील,लायन लहू भोईर,लायन नागेश देशमाने,लायन एस.जि.चव्हाण,लायन ज्योती देशमाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

# वय चोरणाऱ्या खेळाडूंवर 'आरडीसीए' करणार कडक कारवाई

रायगड जिल्ह्यातील काही अकॅडमी आणि क्लबच्या खेळाडूंनी आपल्या वयाचे, जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे खोटे दाखले व पुरावे तयार केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्याला पायबंध बसावा व संबंधित लोकांवर कडक कारवाई व्हावी यासाठी आरडीसीएच्या कार्यकारिणी मंडळाची सभा १० डिसेंबर रोजी पेण येथे झाली. त्यामध्ये खोटे वयाचे व रहिवासी असल्याचे बनावट पुरावे तयार करणाऱ्या खेळाडूंवर दोन वर्षाची बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे तसेच असा खेळाडू ज्या संघात खेळत असेल त्या संघाला स्पर्धेतून बाद करण्यात येईल व संघाला १० हजार रुपये दंड म्हणून द्यावा लागेल असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांनी जिल्ह्यातील सर्व अकॅडमी व क्लबच्या संघांना आवाहन केले आहे की, खोटे वयाचे व रहिवासी असल्याचे दाखले तयार करून आपल्या संघाची प्रतिष्ठा व खेळाडूंचे क्रिकेट करिअर याला डाग लागून देऊ नये. असे कोणी सापडल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल.

# मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार निरंजन डावखरे यांची नियुक्ती

**ठाणे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) भाजपाचे आमदार निरंजन वसंत डावखरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे प्रतिनिधी म्हणून आमदार डावखरे यांना नामनिर्देशित करण्यात आले आहे.



विधीमंडळातील तरुण चेहरा म्हणून आमदार निरंजन डावखरे यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातून त्यांची २०१२ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी विधान परिषद निवडणुकीत हॅट्रिक नोंदविली. गेल्या १२ वर्षांच्या काळात त्यांनी विधान परिषदेत शैक्षणिक, सामाजिक आणि नागरी समस्यांकडे सातत्याने लक्ष वेधले. तसेच ते सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. राज्यातील शिक्षकांचे प्रश्नही त्यांनी हिरीरीने मांडले. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या मांडल्या असून, ऋएमपीएससी'साठी बेलापूर येथे स्वतंत्र मुख्यालय मंजूर करुन घेतले. कोकणातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी सर्व शाळा डिजिटल करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यानुसार आतापर्यंत कोकणातील शेकडो शाळांना संगणकासह विविध साहित्यपुरवठा करण्यात आला.

मुंबई विद्यापीठाच्या कक्षेत कोकणातील पाच जिल्ह्यातील महाविद्यालये आहेत. त्याचबरोबर काही शहरात विद्यापीठाची उपकेंद्रे आहेत. मुंबई विद्यापीठ प्रशासन आणि महाविद्यालयातील समन्वय, तसेच उपकेंद्रात नवे अभ्यासक्रम आणि प्रशासकीय सुधारणा आदी करण्यामध्ये आमदार निरंजन डावखरे यांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

आमदार डावखर हे दक्ष लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# धक्कथा स्पर्धेबाबत आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वामीराज प्रकाशनच्या वतीने धक्कथा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. धक्कथा म्हणजे धक्कादायक शेवट असलेली कथा. वाचकाला अनपेक्षित अशी कलाटणी शेवटी असलेली कथा अशी कथा तुम्ही लिहू शकता का? लिहिली आहे का? मग ती पाठवा आमच्याकडे. आम्हाला धक्का बसला तर तिची पारितोषिकासाठी निवड करून (किंवा न करून) करण्यात येईल.

स्पर्धकाला शब्द संख्येची मर्यादा असली तरी वयाचे बंधन नाही. एका स्पर्धकाने एकच कथा पाठवावी. स्पर्धकाने आपली कथा PDF आणि docx किंवा युनिकोड या दोन्ही प्रकारात swamirajprakashan@gmail.com यावर पाठवावी. कथा पाठवण्याची अंतिम तारीख २६ जानेवारी २०२५ आहे. प्रसिद्ध धक्कथाकार ज्येष्ठ पत्रकार संपादक मुकेश माचकर हे स्पर्धेचे परीक्षण करतील. स्पर्धेतील सर्व कथांच्या प्रसिद्धीचे अधिकार स्वामीराज प्रकाशन राखून ठेवत आहे. त्याचे वेगळे मानधन मिळणार नाही.

प्रथम ३००० रुपये, द्वितीय २००० रुपये, तृतीय १००० रुपये, उत्तेजनार्थ (१० कथा) : ५०० रुपये आणि सर्वांना सन्मानचिन्ह व इतर सर्व कथाकाराना सहभाग सन्मानपत्र प्रदान करण्यात येईल.

## दुखवटा


### सुरेशचंद्र गवळे

**माणगाव :** महाराष्ट्र प्रदेश भाजप महिला मोर्चाच्या सचिव यशोधरा गोडबोले यांचे थोरले बंधू प्रज्ञा विकास बौध्दजन मंडळ माणगांवचे सभासद सुरेशचंद्र भगवानराव गवळे (वय ४७) यांचे शनिवारी (दि.१४) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, भाऊ, दोन बहिणी, दोन मुले असा परिवार आहे. कै. सुरेशचंद्र गवळे यांचा जलदान विधी बुधवारी (दि.१८) मूळगावी धनेगाव नांदेड येथे होणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.



### खुशालचंद व्यास

**पनवेल :** खुशालचंद गोपीचंद व्यास उर्फ नथुभाऊ व्यास (वय ७५) यांचे निधन झाले. ते पनवेलमधील ख्यातनाम व्यापारी विरेंद्र कुमार रतनचंद बांठीया यांच्याकडे गेली ५८ वर्षे त्यांचे आर्थिक व्यवहार पहात होते. नथुभाऊ हे अत्यंत मनमिळाऊ व विश्वासु असे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या अंत्ययात्रेला पनवेलमधील व्यापारी वर्ग, त्यांचे मित्र परिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## निवडक

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**पनवेल :** भरधाव वेगात चाललेल्या वॅगेनार गाडीने मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकलस्वार गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील बोर्ले गावाच्या हद्दीत घडली आहे. वॅगेनार गाडी (एमएच-१२-एनजे-३०६३) ही घेवून चालक भरधाव वेगाने बोर्ले टोल नाका येथून २०० मीटर अंतरावर पंचशिल नगर बोर्डजवळ, बोर्ले गावाजवळ आला असताना त्याने मोटरसायकल (एमएच-४६-एम-५२११) हीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात सचिन पाटील (वय ४२) हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोन्याची चेन खेचून चोर पसार

**पनवेल :** ॲटीव्हासारख्या स्कूटी गाडीवरून एका महिलेच्या समोर येवून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून पसार झाल्याची घटना पनवेल शहरातील पनवेल बस स्टॉपच्या मागे असलेल्या पाण्याच्या टाकीसमोरील रस्त्यावर घडली आहे. इंदिरा इसाक नाडर (६३ रा.तक्का गाव) या सदर ठिकाणी असताना ॲक्टीव्हा सारख्या स्कूटीवरुन समोरून आलेल्या एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील जवळपास ७५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून तो पसार झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये अतिक्रमणविरोधी कारवाई तीव्र

## महापालिका क्षेत्रातील अनधिकृत शेड, सामानासह झोपड्या हटविल्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नुकत्याच झालेल्या बैठकित पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य व्यवसायिकांवर आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई करण्याबाबत संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्यानूसार चारही प्रभागांमध्ये मंगळवारी (दि.१७) फुटपाथवरील अतिक्रमण, रस्त्यावरील अतिक्रमण, अनधिकृत शेड, अनधिकृत झोपड्या व इतर अतिक्रमणा विरोधात कारवाई करण्यात आली.




अतिक्रमण विभाग उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या आदेशाने प्रभाग समिती अ उप विभाग नावडे हद्दीतील खारघर सेक्टर ३० मधील सिडको भूखंडा वरील ३५ मध्ये अनधिकृत ताडपत्री शेडवर तोडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत प्रभारी अधीक्षक अमर पाटील, अतिक्रमण पथक उपस्थित होते. खारघर विभाग व नावडे विभाग यांच्यामार्फत पूर्ण कारण्यात आली. तसेच उप विभाग नावडे खारघर सेक्टर ३० मधील अनधिकृत मार्केटवर कारवाई करण्यात आली.

प्रभाग समिती कामोठे हद्दीत सेक्टर ७ मधील फुटपाथवरील अतिक्रमण, अनधिकृत शेड, व इतर अतिक्रमण कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, कामोठे अधीक्षक सदाशिव कवठे व अतिक्रमण पथक प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. खारघरमधील १४ सेक्टरमधील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत व्यवसायिकांवरती जेसीबीच्या सहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली.

कळंबोली सेक्टर १६, १७,२० मधील फूटपाथवरील अतिक्रमणे, रस्त्यावरील अनधिकृत हातगाड्या, अनधिकृत टपऱ्या, अनधिकृत शेड जेसीबीच्या साहाय्याने तोडण्यात आले. या वेळी उपायुक्त रविकिरीण घोडके, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील उपस्थित होते.

प्रभाग समिती ड पनवेल अंतर्गत नवीन पनवेल त्रिवेणी सोसायटी शेजारी पोदी येथील अनधिकृत झोपडपट्टीवरती जेसीबीच्या तोडक कारवाई करण्यात आली. तसेच नवीन पनवेलमधील विचुंबे रोड, स्टेशन रोड परिसरातील खाऊ गल्ली येथे फुटपाथवरील अनधिकृतरित्या ठेवलेले सामान यामध्ये जप्त करून तोडक कारवाई करून परिसर पादचाऱ्यांना चालण्यास रिकामा करण्यात आला. आयुक्त महोदयांच्या सूचनेप्रमाणे खाऊ गल्लीतील अनधिकृत खाद्य पदार्थाच्या स्टॉल्सवरील सिलेंडर जप्त करण्यात आले.

या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने व प्रभारी अधिक्षक रोशन माळी व अतिक्रमण पथकातील कर्मचारी उपस्थित होते. अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे याबाबत महापालिकेकडे तक्रार करायची असल्यास नागरिकांनी (०२२-२७४५८०४०) या क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमदार विक्रांत पाटील यांनी विधान भवनात मांडला पनवेलचा पाणी प्रश्न

**पनवेल : वार्ताहर, कळंबोली : बातमीदार**

अधिवेशनादरम्यान विधान भवनात नवनिर्वाचित आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेलचा पाणी प्रश्न विधानभवनात मांडला.

या वेळी आमदार विक्रांत पाटील यांनी प्रश्न मांडताना सांगितले की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांची पाण्याची गरज भागविताना महापालिकेला अनेक अडचणी निर्माण होत आहे. सध्याची पाण्याची मागणी प्रतिदिन २५९ दशलक्ष लिटर प्रतिदिन २२४ दशलक्ष लिटर पुरवठा होत आहे. सध्याची लोकसंख्या पाहता महानगरपालिकेला ३५ दशलक्ष पाणी अपुरे पडत आहे. या परिसराचा झपाट्याने होणारा विकास पाहता व वाढणारे नागरिकीकरण लक्षात घेता भविष्यात ८५० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाण्याची आवश्यकता



लागणार आहे. भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासाठी सिडकोच्या प्रस्तावित कोणत्याही धरणामध्ये पनवेल महापालिकेस आरक्षण नाही.

पाण्याची गरज भागविण्यासाठी पनवेल महापालिकेने कुंडलिका नदीवरील डोलवहाळ बंधाऱ्यातून ५०० दशलक्ष प्रतिदिन पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयामार्फत कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास २१/०१/२०२४ रोजी सादर केला आहे, परंतु पनवेल महापालिकेच्या पाणी आरक्षणाच्या मागणीपूर्वी कोणताही महापालिकेचा प्रस्ताव पाटबंधारे विभागास सादर केला नाही. पनवेल महापालिकेच्या आवश्यक पाण्याची मागणी शिफारशीसह जलसंपदा विभागाने वरिष्ठ कार्यालयास सादर केली आहे, परंतु त्यावर अद्यापही कोणतीही कारवाई झाली नाही.

यासाठी शासनाने पनवेल महापालिकेला कुंडलिका नदीवरील डोलवहाळ बंधाऱ्यातून ५०० दशलक्ष पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव तातडीने मंजूर करण्याच्या अनुषंगाने निर्णायत्मक कारवाई करावी, अशी मागणी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती आमदार विक्रांत पाटील यांनी केली आहे.

# कुसूम अभियानाचा लाभ घ्या -दर्शना भोईर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्याकरिता १६ ते २० डिसेंबर कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र 'कुसूम' अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जाणार आहे. या अभियानाचा शुभारंभ पनवेलमध्ये सोमवारी (दि.१६) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ करण्यात आला. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी समाजातील कुष्ठरोगाची लक्षणे असणाऱ्या नागरिकांना कुसूम अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.



या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, पीएमडब्ल्यू, अर्जुन ठाकूर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र १चा संपूर्ण स्टाफ, परिचारिका उपस्थित होते.

माजी नगरसेविका दर्शना भोईर म्हणाल्या की, समाजामध्ये अनेक नागरिकांना कुष्ठरोगाची लक्षणे समजून येत नाहीत. यासाठी शरिरावर एखादा लालसर डाग, चट्टा अथवा हात पाय वाकडे होत असल्याचे आढळल्यास अशा नागरिकांनी तातडीने पनवेल महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ या ठिकाणी सुरू करण्यात आलेल्या 'कुसूम' अभियानाचा लाभ घ्यावा. महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुष्ठरोगावर उपचार केले जात असल्याचे सांगितले. नागरिकांनी उपचारासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे सांगितले.

या विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या, दुर्लक्षित राहणाऱ्या व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्येही होत नाही. ही बाब लक्षात घेवून या घटकांसाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) राज्यात राबविण्यात येत आहे.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या अध्यक्षपदी मंदार दोंदे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या अध्यक्षपदी मंदार दोंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचची वार्षिक सर्वसाधारण बैठक मंचाचे सल्लागार ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील आणि अविनाश कोळी व मावळते अध्यक्ष विवेक पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या वेळी सन २०२५ सालाकरिता कार्यकारिणीची निवड बिनविरोध जाहीर झाली. त्यानुसार ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अविनाश कोळी, विवेक पाटील आणि संजय सोनावणे मंचाचे सल्लागार असणार आहेत.

सरचिटणीसपदी हरेश साठे, उपाध्यक्षपदी राजेंद्र पाटील, खजिनदारपदी संजय कदम, कार्यकारिणी सदस्य म्हणून



नितीन कोळी, प्रवीण मोहोकर, राजू गाडे, दीपक घोसाळकर, तृप्ती पालकर, दत्ता कुलकर्णी, भरतकुमार कांबळे हे जबाबदारी पार पाडणार आहेत.

समाजहिताचे कार्य करण्यात पनवेल तालुका पत्रकार विकास मंच नेहमीच अग्रणी राहिले आहे. मंचाने दुर्गम भागातही कार्य पोहोचवले आहे. त्या अनुषंगाने हि परंपरा कायम ठेवण्यासाठी यापुढेही सामाजिक व शैक्षणिक उपक्रमे मोठ्या प्रमाणात राबविणार असल्याचे मंदार दोंदे यांनी स्पष्ट केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे डेंग्यू व मलेरिया रोगांविषयी जनजागृती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवारी (दि.१७) डेंग्यू व मलेरिया रोगांविषयी पनवेल तालुक्यातील भानघर व उमरोली या गावात जनजागृती करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी या दोन्हीही गावातील प्रत्येक घरामध्ये जाऊन डेंग्यू व मलेरियाच्या साथीबद्दल नागरिकांना योग्य ती माहिती दिली व त्या रोगांपासून कसे स्वतःला वाचवावे याविषयी जनजागृती केली तसेच या दोन्ही रोगाची लक्षणे कोणकोणती असतात याविषयी



नागरिकांना मोलाची माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने हा सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे विद्यार्थ्यांची कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी केले तसेच प्रा. नीलम मोरे व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी, इतर सर्व कार्यक्रमाधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# बूट कॅम्प-वॉलंटियर इंटिग्रिटी ॲण्ड लीडरशिप शिबिर उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेलच्या एनएसएस युनिटने मूव्हमेंट इंडियाच्या सहकार्याने मंगळवारी (दि.१७) बूट कॅम्प - वॉलंटियर इंटिग्रिटी ॲण्ड लीडरशिप या शिबिराचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व एनएसएस स्वयंसेवकांमध्ये नेतृत्व व सांघिक कौशल्य वाढविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

शिबिरादरम्यान, सहभागींनी विविध प्रकारच्या संघ-बांधणी आणि अनुभवात्मक क्रियाकलापांमध्ये भाग घेतला ज्यात मालकी, सचोटी आणि सेवक नेतृत्व यासारख्या मुख्य मूल्यांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले. सांघिक वातावरणात सहकार्य आणि समन्वयाचे महत्त्व जाणून घेत स्वयंसेवकांची गटांमध्ये विभागणी करण्यात आली. शिबिराचे संयोजन प्रीती चटर्जी यांनी केले, तर मूव्हमेंट इंडियाच्या एस्थर ॲना सॅम पाहुण्या वक्त्या म्हणून काम पाहत होत्या.

या कार्यक्रमाला भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयचे एनएसएस अधिकारी राघव शर्मा, अपराजिता गुप्ता आणि संग्राम पवार यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समर्पित स्वयंसेवकांच्या आयोजक संघाने महत्त्वाची भूमिका बजावली.

# अभिनेत्री प्रियांका झेमसेची लघुपटात चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लघुपट हे समाजाचा आरसा दाखवणारं प्रभावी माध्यम आहे. अशाच एका लघुपटानं प्रेक्षकांना अंतर्मुख केलंय. 'मी राणी' हा लघुपट आई-मुलीच्या नात्यावर आधारित आहे. शिवानी मेहरा यांच्या कुशल दिग्दर्शनातून साकारलेली ही कथा एका खेड्यात राहणाऱ्या अंजू (प्रियांका झेमसे) आणि तिची मुलगी राणीची (भाविका परडे) आहे.



प्रियांका झेमसे ही पनवेलमध्ये राहणाऱ्या व रायगड जिल्ह्यातील पेणच्या माजी नगरसेविका ॲड. शुभांगी झेमसे यांच्या कन्या आहेत. वाढदिवसाकरिता आपल्या मुलीचे एक छोटे स्वप्न पूर्ण करून देण्यासाठी धडपडणारी आई आणि तिच्या संघर्षाने भरलेल्या प्रवासाने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. बेस्ट ऑफ इंडिया शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल (यूके) २०२४मध्ये ग्रँड ज्युरी पुरस्कार जिंकून या लघुपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले आहे.



अभिनेत्री प्रियांका झेमसे म्हणाली, मी राणी या लघुपटाची कथा आणि त्याचा आशय मंत्रमुग्ध करणारा आहे. आपल्या भाषेतील आपली स्वतःची कलाकृती आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजली जाते. तेव्हा एक मराठी आणि भारतीय म्हणून मनात निर्माण होणारा आनंद आणि समाधान हे शब्दांत मांडता येत नाही. विशेष म्हणजे, या लघुपटाला सॅन फ्रान्सिस्को शॉर्ट्स टीव्हीच्या विशेष प्रदर्शनात योग्य प्रतिसाद मिळाला तर ऑस्करच्या शर्यतीतदेखील संधी मिळू शकते.

ग्रामीण भारतातील सामाजिक, आर्थिक स्थितीचे वास्तववादी चित्रण लघुपटात दाखवण्यात आलेय. यामध्ये मुख्य भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री प्रियांका झेमसेचे सर्व स्तरावर कौतुक होतेय. आपल्या मुलीच्या स्वप्नांसाठी सर्वस्व झोकून देत केलेली धडपड आणि पालकांच्या अढळ इच्छाशक्तीचे प्रतिकात्मक चित्रण लघुपटात करण्यात आलेय.

### मृतदेह आढळला

**पनवेल :** शहरातील जरीमरी गार्डन समोर मोकळ्या मैदानाच्या रस्त्याच्या कडेला एकाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्षे, डोक्याचे केस काळे, दाढी मिशी वाढलेली व काळी, बांधा सडपातळ, उंची अंदाजे पाच फुट चार इंच आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो. नि.सारिका झांजुर्णे यांच्याशी संपर्क साधावा.

### दुचाकीची चोरी

**पनवेल :** राज मंजनर यांनी त्याच्या ताब्यातील १० हजार रुपये किंमतीची ग्रे रंगाची होंडा ॲक्टीव्हा गाडी रेल्वे स्थानकाबाहेर असलेल्या कमानीजवळ रिक्षा स्टॅण्ड समोरील मोकळ्या जागेत उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात लिंग समानतेविषयी मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर आणि जीव विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१६) व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग व पुणे व्यवस्थापन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने लिंग संवेदना जनजागृतीपर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्राचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थिनींना लिंग समानता तसेच त्याच्याविषयी असणारी जनजागृती व्हावी हा होता. या सत्रासाठी प्रमुख वक्त्या म्हणून दिपाली सदावर्ते यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींना लिंग समानतेविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन केले तसेच या वेळी त्यांनी विद्यार्थिनींना प्रिव्हेन्शन ऑफ सेक्सुअल हॅरास्मेंट कायदा २०१३ विषयी अतिशय चांगल्या पद्धतीने माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थिनींना या सत्रासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. रेवन शिंदे, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. अर्पिता, प्रा. शितल चव्हाण, प्रा. शगुप्ता विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## संपादकीय

# काँग्रेस एकाकी!

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालांना लवकरच महिना पूर्ण होईल. मात्र इतके दिवस होऊनही अद्यापही काँग्रेस पक्षाने आपल्या भीषण कामगिरीचे खापर ईव्हीएमवर फोडण्याचे धोरण सोडलेले नाही. यापूर्वी निवडणूक आयोग आणि न्यायालयांनीही ईव्हीएममधील छेडछाडीचे आरोप स्पष्टपणे फेटाळून लावले आहेत. आता तर 'इंडिया आघाडी'तील काँग्रेस पक्षाच्या मित्रपक्षांनीच ईव्हीएमविरोधाबद्दल त्यांना सुनावले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्ष या मुद्यावर एकाकी पडल्याचे स्पष्ट दिसते आहे.

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालांना महिना होत आला तरी काँग्रेस पक्षाने या निवडणुकीतील आपल्या दारूण पराभवाविषयी आत्मपरीक्षण केलेले दिसत नाही. उलट काँग्रेस पक्ष व विशेषत: विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी यासंदर्भात ईव्हीएम विरोधातली आपली आगपाखड सुरूच ठेवली आहे. महाराष्ट्रातील जनतेने भारतीय जनता पक्ष व महायुतीला इतके भरभरून यश का दिले असावे याची कारणमीमांसा तपासण्याची प्रगल्भता त्यांनी अद्यापही दाखवलेली नाही. परंतु ईव्हीएम विरोधाच्या त्यांच्या आक्रस्ताळ्या भूमिकेला 'इंडिया आघाडी'तील मित्रपक्षांचाही पाठिंबा नाही हेही आता स्पष्ट झाले आहे. या लोकांनी आता ईव्हीएमची तक्रार करणे थांबवायला हवे आणि निवडणुकीचा जो काही निकाल समोर आला आहे तो स्वीकारायला हवा, अशा शब्दांत जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काँग्रेस पक्षाला सुनावले आहे. तुम्ही जिंकलात की ईव्हीएमवर टीका करत नाही आणि पराभूत झाल्यावर ईव्हीएमला दोष देता. तुम्ही निवडणुकीचे निकाल का स्वीकारू शकत नाही हे कळतच नाही, अशा स्पष्ट शब्दांत ओमर अब्दुल्ला यांनी ईव्हीएमविरोधाविषयीची आपली नाराजी व्यक्त केली. याच ईव्हीएम मशीनच्या जोरावर तुम्हाला लोकसभा निवडणुकीत शंभरपर्यंत जागा मिळाल्या. तेव्हा तुम्ही जणु काही विजयी झाल्याप्रमाणे उत्सव साजरा केला होता. त्यानंतर अवघ्या काही महिन्यांत तुम्हाला लोकसभेप्रमाणे अपेक्षित यश मिळाले नाही म्हणून तुम्ही आता ईव्हीएमला दोष देत आहात, अशी स्पष्ट कानउघाडणी अब्दुल्ला यांनी केल्यानंतर आता तरी काँग्रेस पक्ष ईव्हीएमविरोधातली आपली रडारड थांबवेल अशी अपेक्षा आहे. काँग्रेसच्या ईव्हीएमसंबंधी भूमिकेतला हा दुटप्पीपणा यापूर्वी निवडणूक आयोगाने व न्यायालयानेही दाखवून दिला आहे. ईव्हीएममध्ये व्हायरस आत जाण्याचा धोका नाही तसेच स्वायत्त युनिट्स असल्यामुळे बाहेरून काही छेडछाड केली जाण्याचीही शक्यता नाही. त्यामुळे ईव्हीएम विश्वसनीय व छेडछाडमुक्त असल्याची ग्वाही यापूर्वी अनेक स्तरांवरून दिली गेली आहे. खेरीज, यंदाच्या राज्यातील विधानसभा निवडणुकांबाबत पराभूत उमेदवारांच्या मागणीनुसार अनेक ठिकाणी निकालांची पुनर्तपासणी करण्यात आली. अशा सर्व ठिकाणी व्हीव्हीपॅट स्लिप आणि मिळालेली मते यांची जुळवाजुळव योग्यच असल्याचे आढळून आले. एवढे सारे होऊनही राहुल गांधी आणि इंडिया आघाडीतील आणखी काही मोजकेच नेते पराभव न स्वीकारता ईव्हीएमचा मुद्दा लावून धरत आहेत. यासंदर्भात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षानेही सुरूवातीपासूनच काँग्रेस पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. ईव्हीएम संदर्भात प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी निवडणूक आयोगाला पुराव्यांसहित विसंगती दाखवून द्यावी. नुसतेच पोकळ आरोप करू नयेत, असे मत तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी व्यक्त केले आहे. नॅशनल कॉन्फरन्ससोबतच तृणमूल काँग्रेसनेही ईव्हीएमविरोधात काँग्रेसची साथ सोडल्याने या मुद्यावर काँग्रेस पक्ष एकाकी पडल्याचे स्पष्ट दिसते आहे. आता तरी काँग्रेसला यासंदर्भातील स्वत:ची चूक ध्यानात यावी.**

# इतिहास संशोधक मुरलीधर गुळवणी



महाराष्ट्रातील अभ्यासू इतिहाससंशोधक, कुशल इतिहासकथनकार, वस्तुसंग्राहक व शिक्षक मुरलीधर गोपाळ गुळवणी यांचा आज स्मृती दिन. त्यांचा जन्म ६ फेब्रुवारी १९२५ पन्हाळा येथे रोजी झाला होता.

पन्हाळा परिसरातील इतिहासाचे पुरावे गोळा करून त्याचे विश्लेषण करणे हा त्यांचा निदिध्यास होता. आदिलशहाने किल्ले पन्हाळा येथे स्थापन केलेल्या दत्तमंदिराचे पुजारीपण व नंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे पुरोहितपण परंपरेने लाभलेल्या कोल्हेरभट गुळवणी ह्यांच्या ११व्या पिढीतले वारसदार. वडील पेशाने पुजारी, ज्योतिषी व वैदिक मु.गों.चे ज्योतिषशास्त्राचे, विविध सूक्तांचे व वेदांचे अध्ययन घरीच त्यांच्या चुलत्यांपाशी झाले. पन्हाळ्याच्या ए.व्ही. हायस्कूलमध्ये मराठी ७वी पर्यंत, पन्हाळा हायस्कूलमध्ये १०वीपर्यंत शिक्षण. नंतर कोल्हापूरच्या न्यू हायस्कूलमधून ११वी मॅट्रिक झाल्यावर लगेचच काही काळ मामलेदार कचेरीत उमेदवारी केल्यावर पन्हाळा हायस्कूलमध्ये गणित व संस्कृत शिक्षकाची नोकरी धरली. त्याच वेळी बाहेरून परीक्षा देऊन बी.ए.(इतिहास) व बी.टी. झाले. वडिलांचे निधन, वतने खालसा झालेली व कुळकायद्यात जमिनी गेलेल्या, त्यामुळे कुटुंबाची स्थिती हलाखीची होती. म्हणूनच इतिहासाची आत्यंतिक आवड असूनही त्यांनी अध्यापन हा उदरनिर्वाहाचा पेशा व इतिहास -संशोधन हे जीवितसाध्य ठरवून टाकले. त्यादृष्टीने पन्हाळ्यासारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणचे त्यांचे वास्तव्य पोषक ठरले.

त्यांनी ऐतिहासिक संदर्भ साधने आणि कागदपत्रांवर आधारित काही छोट्या ऐतिहासिक कथा व प्रबोधनपर कविता लिहिल्या आहेत. तसेच, संशोधनावर आधारित पुस्तकेही त्यांनी लिहिली. पंत आम्ही निघालो, जय केदार, सादोबा, पन्हाळा, पन्हाळगड ते विशाळगड, यादवेंद्र स्वामी, करवीरचा खजिना, ऐतिहासिक मौलिक संशोधने, हुकुमत पनाह,स्वातंत्र्याचा फटका, गुळवणी कुलवृत्तांत, आकाशाशी जडले नाते ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली. पन्हाळ्याच्या परिसरातील समग्र ठिकाणांचा इतिहास त्यांना मुखोद्गत होताच, पण तो सांगताना श्रोत्यांच्या मन:चक्षूंपुढे तो प्रसंग जिवंत होईल अशी कथनशैली अवगत होती.

लहानपणापासूनच त्यांना जुन्या पोथ्या, नाणी, अवशेष गोळा करण्याचा छंद होता. मोठेपणी त्यात कागदपत्रे, दस्तऐवज, शस्त्रे, मूर्ती, शिलालेख, ताम्रपट, जुनी (१८०० सालापासूनची) लाटकर व पारनेरकर ह्यांची पंचांगे, वगैरे ऐतिहासिक साधनांची भर पडत गेली. त्यांचा आधार घेत, दऱ्याखोऱ्यातून भटकंती करून त्यांनी अज्ञात इतिहासाचा शोध घेतला आणि चुकीचा इतिहास खोडून त्यातून सत्याचे दर्शन घडविले. शिवा काशिद, जोत्याजी केसरकर, धनाजी जाधव, बाजीप्रभु व फुलाजीप्रभु देशपांडे ह्या पराक्रमी वीरांच्या अनुक्रमे नेबापूर, पुनाळ, पेठवडगाव आणि विशाळगड येथील समाध्या प्रयत्नपूर्वक शोधून त्यांनी त्या पुराव्यानिशी सिद्ध केल्या. तसेच छ. राजसबाई, कोल्हापूरचे पहिले छ. शिवाजी ह्यांच्या समाध्या, जखुबाई तेलीण प्राणार्पणस्थळ, पन्हाळ्याचे प्राचीन प्रवेशद्वार, बालेकिल्ला व अंबरखाना, छ. शिवरायांचे निवासस्थान, प्राचीन गुहा, फारसी शिलालेख, बारद्वार हे संभाजी महाराजांचे आडवाटेवरचे टेहळणीचे ठिकाण, ह्या पन्हाळ्यातील अज्ञात ठिकाणांचाही अचूक वेध त्यांनी घेतला. तसेच करवीरचे सरदार यशवंतराव थोरात आणि त्यांच्या पत्नीचे पन्हाळ्याच्या पायथ्याला असलेले स्मृतिमंदिर, हे काल्पनिक कथेची नायिका थोरातांच्या कमळेचे थडगे नाही हे सिद्ध केले आणि छ. संभाजी महाराजांच्या चारित्र्यावरील डाग सप्रमाण पुसून टाकण्याचे मौलिक कार्य केले. रामदासकालीन मारुती व पोहाळे येथील लेणी त्यांनी शोधून काढली. पन्हाळ्यावरच्या प्रसिद्ध तीन दरवाजांची बारकाईने पाहणी करून पहिल्या व तिसऱ्या दरवाजाच्या कमानी मुस्लिमकालीन, पण दुसऱ्या दरवाजावरील नागाच्या फणीवरून तो भोजकालीन असावा असा निष्कर्ष काढला.

भालजी पेंढारकर, गो.नी.दांडेकर, द.वा. पोतदार व ग.ह.खरे हे इतिहासप्रेमी त्यांचे जिवलग मित्र, तर ब.मो.पुरंदरे, जयसिंगराव पवार, अमर अडके हे पुढच्या पिढीतील इतिहासाभ्यासक त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी पन्हाळ्याला येत असत. १९५५ मध्ये ते भारत इतिहास संशोधन मंडळाचे तहहयात सभासद झाले आणि त्यांच्या मोडीवाचनाला गती मिळाली. त्यांनी भालजी पेंढारकरांच्या सल्ल्यानुसार पन्हाळे येथे शिवसंस्कृती मंडळाची स्थापना २० मार्च १९६४ रोजी केली आणि संशोधनात सापडलेली सर्व ऐतिहासिक साधने तिथे वस्तुसंग्रहालय निर्माण करून त्यात ठेवली. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, स्वाभिमानी, पण कमालीचा प्रसिद्धीपराङ्मुख होता आणि वृत्ती समाधानी होती. पन्हाळ्यातील लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना होती. फाय फौंडेशन, इचलकरंजीचा पुरस्कार, पन्हाळाभूषण गौरव, विद्याशंकर भारती, शंकराचार्य मठ,कोल्हापूर यांचा इतिहासभूषण पुरस्कार इत्यादी काही पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. दम्याच्या विकाराने १८ डिसेंबर २००० रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : मराठी विश्वकोष)

# आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस

आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस हा जगातील स्थलांतरितांच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा दिवस आहे. आज जगभरात आंतरराष्ट्रीय स्थलांतराविषयीलोकांमध्ये जागरूकता आणि सकारात्मक विचार करण्याची गरज आहे.

जागतिक शांततेसाठी, कामाच्या शोधात किंवा इतर कारणांमुळे इतर देशांमध्ये स्थायिक झालेल्या लोकांच्या समस्या गांभीर्याने समजून घेणे आणि सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिवस दरवर्षी १८ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांना शिक्षित करणे हा आहे की प्रत्येक स्थलांतरित व्यक्तीशी आदराने वागणे ही मूलभूत गरजांपैकी एक आहे. आजचं सर्वात मोठं प्रहसन हे आहे की स्थलांतर ही एक मोठी समस्या आहे, खरंतर ती संधीसारखी असली पाहिजे. स्थलांतर म्हणजे काय आणि स्थलांतरित कोण आहेत? आंतरराष्ट्रीय स्थलांतर म्हणजे काही कारणास्तव आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून दुसऱ्या देशात राहणे किंवा आसरा घेणे. स्थलांतरित लोक त्यांचे वास्तव्य कायमचे सोडून दुसऱ्या ठिकाणी किंवा दुसऱ्या देशात घरे बनवतात. जे इतर देशांमध्ये स्थायिक होतात त्यांना आंतरराष्ट्रीय स्थलांतरित म्हणतात. स्थलांतरितांच्या समस्या सामान्य लोकांपेक्षा थोड्या वेगळ्या आहेत ज्यामुळे त्यांचे जीवन कठीण होते. मोठी आणि भिन्न आव्हाने आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांसमोरील आव्हाने आणि अडचणींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. १८ डिसेंबर १९९० रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेने सर्व स्थलांतरित आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हक्कांच्या संरक्षणावरील आंतरराष्ट्रीय अधिवेशन स्वीकारले. ४ डिसेंबर २००० रोजी, सर्वसाधारण सभेने जगभरात स्थलांतरितांची वाढती संख्या लक्षात घेऊन १८ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय स्थलांतरित दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. स्थलांतरावर द्विपक्षीय, स्थानिक आणि जागतिक स्तरावर सहकार्य मजबूत करण्यावर सर्वाधिक भर दिला जातो. लोकांच्या स्थलांतरामागे अनेक घटक एकत्र काम करतात. यामध्ये ऐच्छिक नैसर्गिक आपत्ती, आर्थिक आव्हान, अत्यंत गरिबी आणि विवादित संघर्ष यांचा समावेश होतो. २०२० मध्ये, सुमारे २८.१ कोटी आंतरराष्ट्रीय स्थलांतरित होते, जे जागतिक लोकसंख्येच्या ३.६ टक्के आहे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रंट्सचे म्हणणे आहे की स्थलांतरित लोक त्यांच्या ज्ञान, नेटवर्क आणि कौशल्याद्वारे एक मजबूत समुदाय तयार करतात. स्थलांतरितांच्या समस्या, आव्हाने आणि संधींबाबत घेतलेल्या प्रभावी निर्णयांद्वारेच एक आदर्श जागतिक सामाजिक आणि आर्थिक वातावरण तयार केले जाऊ शकते. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान



# आता जीएनएसएस सिस्टमद्वारे कट होणार टोल; जाणून घ्या

GNSS Toll: F-STag सुविधा बदलली जाईल आणि टोल सेटेलाइटद्वारे कापला जाईल. यासाठी GNSS सिस्टम म्हणजेच ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम लागू करण्यात येणार आहे.



जेव्हा आपण एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जातो तेव्हा आपल्याला टॅक्स भरावा लागतो. यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर अनेक टोलनाके बांधले जातात जिथे टोल टॅक्स वसूल केला जातो. मात्र आजही टोलनाक्यांवर लांबच लांब रांगा लागल्या असून त्यामुळे बराच वेळ वाया जातो. फास्टॅगमुळे वेळ आणि पैशाची नक्कीच बचत झाली असली तरी हे तंत्रज्ञान अजूनही फारसे जलद आणि सोयीचे नाही. फास्टॅग हा भारत सरकारचा एक उपक्रम आहे ज्याच्या मदतीने राष्ट्रीय महामार्गावर न थांबता टोल भरता येतो,

पण आता फास्टॅग सुविधेतही बदल करण्यात येणार असून सॅटेलाईटच्या माध्यमातून टोल भरला जाणार असल्याच्या बातम्या येत आहेत. यासाठी GNSS सिस्टम म्हणजेच ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम लागू करण्यात येणार आहे. आता ही नवीन टोल वसुली यंत्रणा कशी काम करेल हे जाणून घेऊया...

याबाबत माहिती देताना रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, भारतातील काही निवडक राष्ट्रीय महामार्गांवर GNSS (ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम) आधारित टोल सिस्टम केली जाईल. ही सिस्टम लागू झाल्यानंतर वाहनांना फास्टॅगची गरज भासणार नाही आणि मुख्य म्हणजे लोकांना टोल कटींगसाठी रांगेत उभे राहण्याची गरज राहणार नाही.

GNSS यंत्रणा थेट सॅटेलाइटशी जोडली जाईल आणि त्यासाठी स्वतंत्र टोल बूथ बांधले जातील. या नवीन टोल नाक्यांवर महामार्गावरून जाणाऱ्या सर्व वाहनांचा डेटा गोळा केला जाईल, जसे की कोणत्या वाहनाने किती प्रवास केला. ही सिस्टम लागू करण्यासाठी सरकारने तयारी सुरू केली आहे.

# माजी क्रिकेटपटू विजय हजारे



निमित्त

भारतीय संघाचे माजी कर्णधार विजय हजारे यांनी भारतीय क्रिकेटला जगामध्ये नवी ओळख दिली. त्यांनी महाराष्ट्रासाठी क्रिकेट खेळले आणि १९५१ ते १९५३ दरम्यान १४ सामन्यांमध्ये भारतीय क्रिकेट संघाचे नेतृत्वही केले.

११ मार्च १९१५ या दिवशी जगातील महान फलंदाजांपैकी एक विजय सॅम्युअल हजारे यांचा जन्म झाला. महाराष्ट्रातील सांगली येथे एका शिक्षकाच्या घरी जन्मलेल्या विजय हजारे यांच्या नावावर अनेक ऐतिहासिक नोंदी आहेत, पण एक अशी कामगिरी आहे जी इतिहासात कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला क्रिकेट इतिहासातील पहिला विजय मिळवून देण्याची ही कामगिरी आहे. वास्तविक, भारतीय संघाने २५ जून १९३२ रोजी क्रिकेट विश्वात प्रवेश केला होता. पण पहिला विजय नोंदवण्यासाठी त्याला २० वर्षे वाट पाहावी लागली. वास्तविक, भारतीय संघाने क्रिकेट इतिहासातील २५ वा सामना इंग्लंडविरुद्ध चेन्नई येथे खेळला. हा सामना ६ फेब्रुवारी १९५२ पासून खेळला गेला. या सामन्यात विजय हजारे भारतीय संघाचे नेतृत्व करत होते. या सामन्यात विजयने बॅटने चांगली कामगिरी केली नसली तरी त्याने आपल्या रणनीतीने इंग्रजांना थक्क केले.इंग्लंडचा एक डाव आणि ८ धावांनी पराभव झाला हा असा सामना होता ज्यात विजय हजारे यांनी आपल्या कर्णधारपदाने इंग्रजांची शान मोडली. वास्तविक, या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडचा डाव आणि ८ धावांच्या फरकाने पराभव केला. या सामन्यात डोनाल्ड केरच्या नेतृत्वाखाली इंग्लंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत २६६ धावा केल्या. विजय हजारे यांची गणना जगातील महान फलंदाजांमध्ये केली जाते. यानंतर भारतीय संघाने पहिल्या डावात ९ गड्यांच्या मोबदल्यात ४५७ धावा केल्या आणि डाव घोषित केला. संघाकडून पॉली उमरीगरने सर्वाधिक नाबाद १३० आणि पंकज रॉयने १११ धावा केल्या. अशा प्रकारे भारतीय संघाने पहिल्या डावात १९१ धावांची आघाडी घेतली होती. या पहिल्या विजयाचा नायक होता विनू मांकड. पण दुसऱ्या डावात इंग्लंडचा संघ १८३ धावांवरच मर्यादित राहिला आणि एक डाव आणि ८ धावांनी सामना गमावला. या सामन्याचा खरा हिरो होता डावखुरा फिरकी गोलंदाज विनू मांकड, ज्याने पहिल्या डावात ५५ धावांत ८ बळी घेतले. यानंतर त्याने दुसऱ्या डावातही कामगिरी सुरू ठेवत ५३ धावांत ४ बळी घेतले. गुलाम अहमदने दुसऱ्या डावातही ४ बळी घेतले. अशा प्रकारे विजय हजारे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पहिला विजय नोंदवला.

विजय हजारे यांनी प्रथम श्रेणी कारकिर्दीत ५८.३८च्या सरासरीने एकूण १८,७४० धावा केल्या, ज्यात १० द्विशतकांचाही समावेश आहे. रणजी ट्रॉफीच्या इतिहासात प्रथमच त्रिशतक झळकावणारा खेळाडू देखील विजय हजारे होता. महाराष्ट्राकडून खेळताना त्याने बडोद्याविरुद्ध ३१६ धावांची नाबाद खेळी खेळली. १८ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!



मुरूड : येथे दत्त जयंतीसाठी कोळी बांधव किनारी बोट घेऊन परतले. किनाऱ्यावर सजवलेल्या या बोटी दिसत आहेत.

## आरोग्य प्रहर

# रात्रभर पाण्यात भिजवलेले ड्रायफ्रुट्स खाणं योग्य आहे का?

ड्रायफ्रूट्स रात्रभर भिजवून खाणे अधिक फायदेशीर मानले जाते. आता आपल्यापैकी बहुतेक जण ते पाण्यात भिजवतात; परंतु ते दुधात भिजवणे आपल्या आरोग्यासाठी अधिक चांगले असू शकते का?



**पाण्यात भिजवलेले ड्रायफ्रुट्स खाण्याचे फायदे**

आपल्यापैकी अनेकांना हे ठाऊक असेल की, बदाम, अक्रोड किंवा खजूर हे ड्रायफ्रूट्स रात्रभर भिजवून खाणे अधिक फायदेशीर मानले जाते. आता आपल्यापैकी बहुतेक जण ते पाण्यात भिजवतात; परंतु ते दुधात भिजवणे आपल्या आरोग्यासाठी अधिक चांगले असू शकते का? याबाबत योग्य माहिती जाणून घेण्यासाठी आम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेतला.

सर्वप्रथम ड्रायफ्रुट्स पाण्यात भिजवल्याने काय होते ते जाणून घेऊ. सल्लागार, आहारतज्ज्ञ व डायबेटिस एज्युकेटर कनिक्का मल्होत्रा, यांनी सांगितले, ड्रायफ्रुट्स पाण्यात भिजवल्याने ते मऊ होते, जे पचनास मदत करते आणि अस्वस्थता दूर करते व फायटिक ॲसिड कमी करून, ते पोषण व शोषण सुधारते. तसेच हे उपयुक्त एन्झाईमदेखील सक्रिय करते. संभाव्यत: पोषण मूल्य वाढवते. हे विविध सुक्या फळांमधील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करू शकते.

दुसरीकडे, ड्रायफ्रुट्स दुधात भिजवण्याचे अनेक पौष्टिक आणि आतड्यांसंबंधीचे फायदे आहेत. ड्रायफ्रुट्समधील जीवनसत्त्वे, खनिजे व फायबरसह दुधातील प्रथिने आणि कॅल्शियम एकत्र करून पोषक घटकांसह दाट पेय तयार केले जाते. ड्रायफ्रुट्स दुधात भिजवल्याने मऊ होतात आणि पोषक घटकांचे शोषण सुधारते, असे कनिक्का म्हणाल्या. त्याशिवाय त्यात आतड्यांचे आरोग्य सुधारण्याची आणि फायदेशीर सूक्ष्म जीवाणूंचा प्रसार वाढवण्याची क्षमता आहे. ड्रायफ्रुट्स दुधात भिजवून, त्यांचे सेवन करणे हा एक उत्तम आणि आरोग्यदायी पर्याय असला तरी प्रत्येक व्यक्तीने आपल्या आरोग्याच्या गरजा आणि संवेदनशीलता, तसेच काही सुक्या मेव्यामधील साखरेच्या प्रमाणाबद्दल सावध असले पाहिजे.

पाण्यात भिजविल्याने प्रामुख्याने पचन सुधारते, फायटिक ॲसिड कमी होते आणि साखरेचे प्रमाण कमी होऊ शकते; परंतु दुधात भिजवल्याने प्रथिने, कॅल्शियम आणि एक परिपूर्ण चवदेखील मिळते, असे कनिक्का म्हणाल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# खोपोली शीळफाट्याची वाहतूक कोंडी फुटेना!

## वाहनांना वाट काढणे होतेय कठीण




**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका क्षेत्रातील शीळफाटा शासकीय गेस्ट हाऊस ते इंदिरा गांधी चौक व पुढील वृशिवन हॉटेल या ठिकाणची वाहतूक कोंडी समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.शीळफाटा येथील वाहतूक समस्याने खोपोली शहर व संपूर्ण तालुक्यातील नागरिक हैराण असून , येथील वाहतूक कोंडीवर तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. दरम्यान शीळफाटा येथे रस्ता रुंदीकरण कामे झपाट्याने सुरू आहेत .ही कामे पूर्णत्वास आल्यावर काही प्रमाणात येथील कोंडी कमी होईल असा दावा खोपोली पालिका व संबंधित प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

शहरातील वाहतूक समस्येचे प्रमुख कारणांपैकी रस्त्यावर उभी करण्यात येणारी खासगी वाहने व बस स्थानकातील एसटी बसेसची वरदळ मुख्य आहे . सदर बस स्थानक शहराच्या बाहेर स्थलांतरित होणे व रस्ता रुंदीकरण तसेच या अंतरात उड्डाण पुलाची निर्मिती हे दोनच प्रभावी पर्याय असल्याने या संदर्भात तातडीने कार्यवाही होण्याची मागणी सर्वपक्षीय नेते , नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

दुसरीकडे येथील विविध व्यापारी संकुलात, हॉटेल्स व अन्य दुकाना समोर वाहने पार्किंग ची व्यवस्था नाही ,यामुळे वाहने रस्त्याच्या कडेला उभी राहत असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे . वाहन तळ सुविधा नाही.बाजारपेठ व इतर महत्वाच्या रस्त्यांवर हातगाड्या व फेरीवाल्यांचा कब्जा झाल्याची स्थिती बनली आहे. तसेच खासगी वाहने व मालवाहतूक करणारे मोठी वाहनेही मुख्य रस्त्यांवर बिनधास्त उभी करण्यात येत आहेत . त्यामुळे रस्ते अडविले जात असून, या ठिकाणी , दुचाकी व पायी चालणाऱ्याना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. खोपोली पोलिसांकडून नियमबाह्य वाहने पार्किंग विरोधात कारवाई होत असली तरी अतिक्रमणे, अनधिकृत फेरीवाले व हातगाडी धारकांविरोधात मात्र नगरपालिका किंवा पोलिसांकडून प्रभावीपणे कारवाई होत नसल्याने येथील कोंडी मोठी जटील समस्या बनली आहे. वर्तमान स्थितीत वाहन संख्या वाढल्याने रस्ते वाहनांच्या पार्किंगने गिळंकृत केले आहेत. समाज मंदिर रोड, बाजार पेठ, शास्त्रीनगर, रेल्वे स्टेशन रोड, शीळफाटा व इंदिरा गांधी चौक या व्यापारी व कायम रहदारी असलेल्या रस्त्यांवर कायम वाहतूक कोंडी होऊन चालणेही कठीण बनले आहे.

> **शीळफाटा व मुख्य बाजारपेठेमध्ये वाहतूक कोंडीची समस्या आहे. नगरपालिकेकडून ही समस्या कमी करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. बाजारपेठेजवळ पे अॅण्ड पार्किंगची व्यवस्था निर्माण करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. शीळफाटा येथे रस्त्यांचे रुंदीकरण काम वेगात सुरू आहे. रस्ता रुंदीकरण झाल्यावर येथील वाहतूक समस्या काही प्रमाणावर कमी होईल**
>
> **–डॉ पंकज पाटील , मुख्याधिकारी खोपोली**

> **शहरातील वाहतूक कोंडी समस्या बाबत अनेक वेळा चर्चा झाल्या आहेत. प्रभावी उपाययोजना मात्र अंमलात आणल्या जात नाहीत. एकतर्फी वाहतूक व गर्दीच्या वेळी मालवाहतूक वाहनांना मनाई बाबतही अंमलबजावणी होत आहे, मात्र वाहन संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने कोंडी वाढत आहे.**
>
> **–गुरुनाथ साठेलकर, सामाजिक कार्यकर्ते**

> **टोईंग वाहनाद्वारे नियमबाह्य वाहने पार्किंग वर दंडात्मक कारवाई केली जाते. शीळफाटा येथील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी प्रभावीपणे व धोरणात्मक उपाययोजना व निर्णयही होत आहेत.**
>
> **–शितल राऊत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खोपोली**

# पेणजवळ गोमांस वाहतूक करणारा टेम्पो जप्त

## अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण–खोपोली मार्गावरून गोवंशीय मांस वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी जप्त केला असून अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी पोलीस हवालदार सचिन व्हसकोटी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रविवारी (दि.१५) पहाटे ६.४४च्या सुमारास पेण–खोपोली रोडवरून गोवंशीय वाहतुकीचा कोणताही परवाना नसताना वाहतूक करणारा टाटा इंट्रा टेम्पो एमएच ०५ एफ जे १५११ हा सावरसई गावच्या हद्दीतील महानगर सीएनजी गॅस पंपाजवळ टेम्पोचा टायर फुटल्याने वाहनचालक टेम्पो तसाच सोडून पळून गेला.

याबाबत माहिती मिळताच पेण पोलीस तेथे आले. या वेळी पोलिसांनी तीन लाख रुपयांचा टेम्पो व सहा लाख हजार ९८ हजार रुपयांचा मांस असा एकूण सुमारे नऊ लाख ९८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



# भादाव पूल मोजतोय अखेरची घटका

- **अनेक वर्षांपासून अवजड वाहतूक बंद**
- **नवीन पूल बांधण्याची राजीव साबळे मागणी**

**माणगाव : बातमीदार**

माणगाव नगरपंचायती मध्ये समाविष्ट असणारा भादाव गावाला जोडणारा काळ नदीवरील भादाव पुल जीर्ण झाला असून याला तडे गेले आहेत. तसेच ठिकाठिकाणी झुडपे वाढलेली आहेत. या पुलावरून गेली अनेक वर्षे अवजड वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे हा जुना पुल अखेरची घटका मोजत असून तो कधीही कोसळून पडून जमीनदोस्त होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

भादाव गावातील ग्रामस्थ दररोज या पुलावरून जीव मुठीत धरून अनेक वर्षे ये जा करीत आहेत. त्यामुळे भादाव गावाला जोडणारा नवीन पुल बांधण्यात यावा अशी मागणी शिवसेना प्रवक्ते अॅड. राजीव साबळे यांनी केली आहे.

हा पुल कालव्याचे पाणी जाण्यासाठी १९७७ साली बांधला आहे. गेली अनेक वर्षे भादाव गावाला चारचाकी आणि तीन चाकी वाहने यांची रहदारी या पुलावरून होत नाही. या पुलावरून केवळ दुचाकी वाहनांची रहदारी सुरू आहे. या गावात जाण्यासाठी वाहनांना तिन किमी वळसा मारून महामार्गावरील काळ नदीच्या पुलावरून जावे लागते. पावसाळ्यात पुर आल्यावर भादाव गावाचा माणगाव शहराशी संपूर्ण संपर्क तुटतो. हे एक हजार लोकवस्ती असलेले गाव आहे. नुकतेच येथे कुंभे – केळगण या महत्वकांक्षी विद्युत प्रकल्पातील विस्थापितांच्या ५०० घरांच्या वसाहतींचे गाव उभारण्यात आले आहे. त्यांनाही मोठ्या प्रमाणावर अडचणी आणि गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याने ते संताप व्यक्त करीत आहेत.

नवीन पुल बांधल्यास माणगाव शहरासारखं भादाव गावाला महत्त्व प्राप्त होऊ शकतो. विशेषतः निजामपूर रोड जवळील कालव्यामार्गे भादाव आणि विंचवली ते ढालघर जोड रस्त्याला जोडले जाऊन मुंबई गोवा महामार्गाला जोडला जाईल. त्यामुळे हा बायपास होऊन दिवसेंदिवस वाढती वाहतूक कोंडी कमी होईल. हा भादाव पुल बांधण्यात आल्यास वाहतूक कोंडी होणार नाही. भविष्यात माणगाव शहर रायगड जिल्ह्याची मध्यवर्ती राजधानी आणि जिल्ह्याचे ठिकाण होणार आहे.

खासदार सुनील तटकरे यांनी यांनी निवडणूक दरम्यान माणगाव येथील निवडणूक सभेत जाहीर केले होते. तसेच भादाव पुलाला मंजुरी मिळवून देईन असे आश्वासन दिले होते. त्याची पुर्तता तातडीने करावी अशी मागणी शिवसेना प्रवक्ते अॅड. राजीव साबळे यांनी केली आहे.



### २४ कोटींचे अंदाजपत्रक तयार

*याबाबत खासदार सुनील तटकरे आणि आदिती तटकरे यांनी सांगितले की, या भादाव पुलाकरीता २४ कोटींचे अंदाज पत्रक तयार झाले आहे, मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता अचानक लागल्याने मंजुरी घेता आली नाही.*

# सुरेश मगर यांची अध्यक्षपदी निवड



**रोहे :** क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीयस्तरावर कार्यरत असलेल्या व मिक्स बॉक्सिंगमध्ये चांगले खेळाडू घडवणाऱ्या इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशनच्या अध्यक्षपदी ओबीसी रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश मगर यांची इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी राकेश म्हसकर यांनी निवड केली आहे. भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर इंडियन मिक्स बॉक्सिंग फेडरेशन ही नामांकित संस्था असून या संस्थेच्या अध्यक्षपदी सुरेश मगर यांची निवड झाल्यामुळे मिक्स बॉक्सिंग या खेळातील खेळाडूंना व ठिकठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धेला मदत होणार आहे. सुरेश मगर यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.


**शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.**
**येथे पीएच.डी. साठी रिक्त जागा**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे शैक्षणिक वर्ष २०१८ पासून मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. आणि एम.फिल. चे संशोधन केंद्र सुरु झाले आहे. या केंद्रावर पीएच. डी. च्या रिक्त असणाऱ्या आठ जागांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. इच्छुकांनी अर्ज महाविद्यालयातून प्राप्त करून घ्यावेत. भरलेले अर्ज कागदपत्रासह दि. २५ डिसेंबर २०२४ पर्यंत महाविद्यालयात जमा करावेत.

**सही/–**
**प्राध्यापक**
**शासकीय अध्यापक महाविद्यालय,**
**पनवेल.**


# उसर खुर्दमधील अभिनव ज्ञानमंदिरात स्वदेशी दिन



**माणगाव : प्रतिनिधी**

अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयात स्वदेशी दिन, हुतात्मा बाबू गेणु बलिदान दिन कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांमध्ये स्वदेशी भाव, हुतात्मा बाबू गेणू यांचा जीवन परिचय व्हावा या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात शिक्षक भिलारे यांनी बाबू गेनु यांचा जीवन परिचय करून दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी मनोगतात हुतात्मा बाबू गेनु यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सत्तेला विरोध म्हणून परकीय मालाच्या भरलेल्या ट्रक समोर स्वतः ला झोकून दिले होते व प्राणांची आहुती दिली होती याचे स्मरण करून दिले. सर्वांनी स्वदेशी भाषा, स्वदेशी वस्तूंचा अंगीकर करावा, असे आवाहन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, खालील उल्लेख केलेल्या मिळकितीच्या गाळा क्रमांक यांची चुक दुरुस्ती ची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| | | | |
|---|---|---|---|
| पनवेल खांदा कॉलनी वृदांवन सो.लि | गाळा क्र.१४ तळमजला | क्षेत्र १७७ चौ.मी. | सेक्टर व प्लॉट से.०९ प्लॉट क्र. २९ व ४१ |

सदरची पेपर नोटीस ही अनुक्रमे मराठी व इंग्रजी भाषेत जाहीर केलेली होती. त्यांचा दि. १९/९/२०२४ व ६/१०/२०२४ असे आहेत.

परंतू सदर नोटीस मध्ये नजर चुकीने गाळा क्र. १४ ऐवजी गाळा क्र. ०९ असा उल्लेख झाला आहे. सदर गाळा क्र. १४ असा वाचव्यात यावा. याबाबत कोणती ही हरकत असल्यास पुढील ३ दिवसात संपर्क साधावा.

**पनवेल.**
**दि. १७/१२/२०२४**

**सही/–**
**अॅड. अनिरुध जाधव**
**श्री. एम.पी. राधा निवास गाळा क्र. २, साईनगर रोड, पनवेल**
**मो. नं ८७६७१७८७९७**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – जुई, तालुका–उरण, जिल्हा–रायगड.**

| भूमापन नं. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ४९/४<br>४९/७<br>४८/४ | ०–२१–७०<br>०–२४–५०<br>०–१९–७० | ०.४५<br>०.५०<br>०.४१ | १. श्री. कमळाकर पांडूरंग पाटील<br>२. श्रीमती कमळूबाई काशिनाथ पाटील<br>३. श्रीमती चंद्राबाई पांडूरंग पंडित<br>४. श्रीमती जयश्री काशिनाथ पाटील<br>५. श्रीमती जोमीबाई जनार्दन पाटील<br>६. श्री. मणिलाल काशिनाथ पाटील<br>७. श्रीमती मंगाबाई चंद्रकांत पंडित |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १७/१२/२०२४**

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन–४०२१०७**

Email: elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website: www.mahapwd.gov.in

दुरध्वनी क्र. ०२१४३–२९९२८८

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा–१/ ४६४७/ सन २०२४** — **दिनांक: १२.१२.२०२४**

### ई–निविदा सुचना क्र. १९ सन २०२४–२५

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती–२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड–४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३– २९९२८८** हे संदर्भाचे अधिन राहुन महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब–१ नमुन्यातील निविदा, ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **मा. कार्यकारी अभियंता (विद्युत), रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई–निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग /इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई–निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | **RASED/OW/234/2024-25**<br>Providing Internal & External El for Bhaktaniwas at Dattatraya Devasthan Temple Chichavali-Goregaon, Tal- Mangaon, Dist.-Raigad | रु. ३,७४१,९१८.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ३७५००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक ०६.०१.२०२५ सकाळी ११:०० |
| २ | **RAESD/OW/209/2024-25**<br>Providing El to Govt. Medical College Canteen at RCF Colony Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad | रु. ९११,५६१.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ९२००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक ०६.०१.२०२५ सकाळी ११:०० |
| ३ | **RAESD/OW/215/2024-5**<br>Providing Internal Electrification, Ethernet, Area Lighting Work, Water Pump, Solar Rooftop System 3KVA, Proposed Teacher training center building BATU Lonere, Dist -Rigad | रु. २,०४३,८९६.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. २०५००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक ०६.०१.२०२५ सकाळी ११:०० |
| ४ | **RAESD/OW/238/2024-25**<br>Providing Internal El, External El at RDA & Executive Engineer, Special cell Raigad fort Office building at Mahad, Dist-Raigad | रु. २,०६९,७६४.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. २०७००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक ०६.०१.२०२५ सकाळी ११:०० |
| ५ | **RAESD/OW/214/2024-2025**<br>Providing CCTV System, Internal Electrification, AC, Area Lighting Work, Water Pump, Solar Rooftop System 5KVA, Proposed Girl's hostel and skill center building BATU Lonere, Dist -Rigad (Sub Work 1 to 5) | रु. ५,६७६,१११.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५६८००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक १५.०१.२०२५ सकाळी ११:०० |
| ६ | **RAESD/OW/213/2024-2025**<br>Providing CCTV System, Internal Electrification, AC, Area Lighting Work & Water Pump, Solar Rooftop System 5KVA, Proposed PG Research center building BATU Lonere, Dist -Raigad (Sub Work 1 to 5) | रु. ४,१४६,५६८.०० | दिनांक १८.१२.२०२४ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक ०२.०१.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | **१) निविदापुर्व बैठक नाही.**<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ४१५००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक १८% GST | दिनांक ०६.०१.२०२५ सकाळी ११:०० |

**खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड–४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.। मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**दिनांक : १७/१२/२०२४**

**सही/**
**(सं.ध. कट्टी)**
**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां. पेण–रायगड**

# पिस्तूल, जिवंत काडतूस हस्तगत

## तीन जण नवी मुंबई गुन्हे शाखा पथकाच्या ताब्यात ▮ एक आरोपी फरार

**पनवेल : वार्ताहर, नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल तालुक्यातील नेरे परिसरातून नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून तीन व्यक्तींकडून दोन लोखंडी अग्नीशस्त्र (पिस्तूल) व एक जिवंत काडतुस हस्तगत केले असून त्यांचा चौथा साथीदार पसार झाला आहे.

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोलीस हवालदार अनिल मांडोळे यांना त्याचे गोपनिय बातमीदारा मार्फत, संशयीत इसम हे हॉटेल न्यु रॉयल कॅफे अन्ड कॅटर्स व नेरे मटण शॉप व चिकन सेंन्टर, नेरे, येथील कॉर्नरवर वाजेकडे जाणाऱ्या रोडवर चार इसम कार मधुन तसेच मोटार सायकल वरून दोन अग्निशस्त्र (पिस्तूल) सात लाख रुपयांमध्ये विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सपोनि अलका पाटील यांची टिम तयार करण्यात आली.




हॉटेल न्यु रॉयल कॅफे अँन्ड कॅटर्स व नेरे मटण शॉप व चिकन सेन्टर, नेरे, येथिल कॉर्नरवर वाजेकडे जाणाऱ्या रोडवर सापळा लावुन बनावट ग्राहकाच्या इशाऱ्यावर कारवाई केली असता पांढऱ्या रंगाच्या मारुती स्वीपट कार (एमएच १२ केजे १६२३) मध्ये तीन इसम त्यामध्ये किशोर दत्ता धाडी, (वय २४, रा.बोनशेत, नेरे), ऋषीकेश रघुनाथ लोटे (२७ रा.वलप), यशवंत बबन सत्रे (वय २४ वर्ष, रा.वलप) यांना सापळा रचून ताब्यात घेतले असता त्यांच्या ताव्यातुन १,२०,००० रूपये किंमतीच्या दोन लोंखडी अग्निशस्त्र (पिस्तूल) तसेच एक जिवंत काडतुस मिळुन आल्यावरून ते जप्त करण्यात आले.

कारवाई दरम्यान यामाहा कंपनीची एमटी मोटरसायकलवर बसुन असलेला इसम त्यांचा साथीदार हा पाच जिवंत काडतुस घेऊन मोटरसायकल सोडुन पळुन गेला आहे. दरम्यान, आरोपी यांनी गुन्हयात वापरलेली कार व मोटार सायकल पोलीसांनी जप्त केली असुन चारही व्यक्तींविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा भारतीय हत्यार कायदा कलम ३, २७ सह बीएनएसक ३ (५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपींकडे मिळुन आलेले पिस्तूल त्यांनी कोणाकडुन प्राप्त केले आहे. याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

# नवी मुंबईत डेंग्यू, मलेरिया रोगासंदर्भात जनजागृती

## दिल्लीच्या पथकाची आरोग्य शिबिरास भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामध्ये डेंग्यू, मलेरिया (हिवताप) रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष शिबिरांचे आयोजन केले जात असून या शिबिरांना नागरिकांचा प्रतिसाद लाभत आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यू आजारांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

दरम्यान, राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, दिल्ली यांच्या संचालक डॉ. तनु जैन यांनी माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय येथे भेट दिली असता हिवताप व डेंग्यू नियंत्रणाबाबत उपाययोजनांची पाहणी केली. त्यांच्यासोबत त्यांचे पथक आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा, पुणे सहसंचालक डॉ. बबीता कमलापूकर, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे उपसंचालक डॉ. अशोक नांदापुरकर तसेच सहाय्यक संचालक, कोकण भवन डॉ. बाळासाहेब सोनावणे आदी उपस्थित होते.

नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्याकरिता १३ डिसेंबर रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांकरिता ९९८३ नागरिकांनी भेट दिली असून, १०४० रक्तनमुने घेण्यात आले.

नमुंमपा कार्यक्षेत्रात हिवताप / डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्याकरिता ३ ऑगस्ट २०२४ ते १३ डिसेंबर २०२४ या कालावधीत एकुण ३४२ जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात



आले असून एक लाख ४९ हजार ८२६ नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला आहे. त्यामध्ये एकूण १३ हजार ८१४ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

केंद्रीय पथकाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, इंदिरानगर येथील जनजागृती शिबिराला भेट दिली. शिबिरामध्ये घरातील व घराभोवतालील डासोत्पत्ती स्थानांची प्रात्यक्षिके बघून या नाविन्यपूर्ण शिबिराची प्रशंसा केली आणि देशातील इतर राज्यातही अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन व्हावे या उद्देशाने त्याचे पूर्ण व्हिडीओ शूटिंग काढून घेतले.

शिबिरांचे वैशिष्टय म्हणजे यामध्ये नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती

> **आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर, टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप, डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल.**
> **–डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नवी मुंबई मनपा**

स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे व आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरीकांना प्रोत्साहित करून आवाहन करण्यात येते.

## निवडक

### डॉ. येळगावकर यांचे व्याख्यान

**नवी मुंबई :** सीवूड्स येथे मानव कल्याणार्थ अणुशक्तीचा वापर या विषयावर भारत विकास ग्रुपचे संचालक डॉ. विवेक येळगावकर यांचे व्याख्यान होणार आहे. सिवूड्स येथील कवी कुसुमाग्रज सार्वजनिक वाचनालय संस्थेतर्फे याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.२१) सायंकाळी ७ वा. सिवुड्स सेक्टर ४२ भुखंड क्र. १९ महावीर कुटीर सोसायटी येथे आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा नागरिकांनी लाभ घेऊन व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुसुमाग्रज वाचनालयातर्फे करण्यात आले आहे.

### मैदानात स्थानिक खेडाळूंना प्राधान्य द्या

**नवी मुंबई :** नेरूळ येथील श्री रामलीला मैदानात सातत्याने क्रिकेट सामने भरविण्यात येत आहेत. दर आठवड्याला सातत्याने असे क्रिकेट सामने भरवले जात असल्याने मैदानावर सराव करणाऱ्या सारसोळे गावातील खेळाडूंना खेळायला मैदान उपलब्ध नसल्याने त्यांची निराश होत आहेत याबाबत माजी प्रभाग समिती सदस्य मनोज मेहेर यांनी हे मैदान सारसोळे गावातील खेळाडूंसाठी देण्यात यावे, अशी मागणी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

# नील हॉस्पिटलमध्ये गर्भाशयमुख कर्करोग निदानाची मोफत चाचणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नील हॉस्पिटल येथे डिवाइन संस्कार रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने आयोजित जनजागृती कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भसंस्कार तज्ञ डॉ. शुभदा नील यांनी महिलांना गर्भाशयमुख आणि स्तन कर्करोग यावर मोलाचे मार्गदर्शन केले.

सर्वांची मोफत एचपीव्ही डीएनए गर्भाशयमुख कर्करोग स्क्रीनिंग चाचणीसुद्धा करण्यात आली.

या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, सरोज मोरे, गीता गुप्ता व अलका आव्हाड योगा शिक्षिका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. या सर्वांचाअ डॉ. शुभदा नील यांनी सत्कार केला.

नील हॉस्पिटल नविन पनवेल येथे, महानगर गॅस लिमिटेडच्या एमजीएल आरोग्य प्रोग्राम या सीएसआर प्रकल्प अंतर्गत तीन हजार रुपयांची एचपीव्ही डीएनए चाचणी मोफत उपलब्ध आहे.

# स्मार्ट इंडिया हॅकाथॉनमध्ये टीम बोकाचा द्वितीय क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने आयोजित केलेल्या स्मार्ट इंडिया हॅकाथॉन २०२४मध्ये टीम बोकाने राष्ट्रीय स्तरावर दुसरे स्थान पटकावले आहे.

सॅवियो डायस, तेजश्री भंगाळे, देवाशिष जावळे, जयेश चौधरी, हर्ष खैरनार, सुहानी भुती अशी टीम सदस्यांची नावे आहेत. वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, मुंबई येथे हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे विशेष प्रमुख पाहुणे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ऑनलाईन कार्यक्रमात सहभागी झाले होते.




संघातील सर्व सहभागी फादर येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिकत आहेत.

एकूण ८,९८,८८४ सहभागी निवडले गेले होते. त्यापैकी दोन विजेते समस्या विधानाच्या प्रत्येक विशिष्ट झोनमध्ये निवडले गेले.

# राष्ट्रीय योग स्पर्धेत ३०० स्पर्धकांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

नवराष्ट्र राष्ट्रीय योगासन स्पर्धा २०२४, आर्ट ऑफ लर्निंग फाउंडेशन यांच्या आयोजनाखाली आणि लायन्स क्लब ऑफ चॅम्पियन्स यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या झाली. या स्पर्धेत भारताच्या विविध राज्यांतून आलेल्या ३००हून अधिक स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

आठ वर्षांखालील गटात श्रींश सावंत आणि अक्षरा, मिथिला पाटील आणि अवधूत चव्हाण, कृशा मोहिते आणि वरद सुतार, ८ ते १३ वर्ष गटात, अर्णव पाटील आणि नारायणी कडू, तन्मय पवार आणि इशिता पाटील, अर्जुन पुजारी आणि अन्वी पवार, १३ ते १८ वर्षे गटात राज मोरे आणि सई पाटील, सिद्धेश कडू आणि अनुष्का अमोन चॅटर्जी आणि वेदिका खोत, १८ ते ३० वर्षे गटात हरिकृष्ण आणि आर्या पाटील, प्रथमेश आणि प्रिया सरोज, सागर शिर्के आणि रोहिणी सहार, ३० ते ५० वर्षे गटात विठ्ठल कडू आणि लतिका मन्ना,



अनिकेत दत्ताराम सावंत आणि सुनीता मौर्य, सागर शेंडे आणि स्वाती एंडुर, ५० ते ७० वर्षे गटात दत्तात्रय जगताप आणि बिमला सिंग, स्वपन डे आणि वसुधा जोशी, शोभा लोकर, ७० वर्षे आणि त्यावरील गटात उमा महेश्वरराव, शंकरराव आवळे यांनी विजेतेपद पटकावले. याकार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवली आणि योगासने व आरोग्याच्या महत्त्वावर भर दिला

ही स्पर्धा सात वयोगटांमध्ये झाली, जिथे प्रत्येक स्पर्धकाने आपले अद्वितीय कौशल्य आणि समर्पण दाखवले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लायन संजीव सूर्यवंशी उपस्थित होते. डॉ. रीना अग्रवाल, डॉ. प्रताप मुदलियार, दिनेश अग्रवाल आणि आर्ट ऑफ लर्निंग फाउंडेशनच्या संपूर्ण टीमच्या अथक प्रयत्नांमुळे हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. सात गटांमध्ये विजेते घोषित करण्यात आले, ज्यांनी आपल्या कौशल्याने आणि कलेने उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेमुळे योगाचे शिस्तबद्ध जीवनशैलीत महत्त्व अधोरेखित झाले.

# श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात बक्षीस समारंभ

**उरण : रामप्रहर वृत्त**

वर्षभरात घेतल्या जाणारे शालेय उपक्रम व स्पर्धा तसेच वार्षिक खेळाच्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यातील विजेत्या व गुणी विद्यार्थ्यांचे कौतुक आणि बक्षीस वितरण सोहळा सोमवारी (दि.१६) द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर येथे आयोजित करण्यात आला होता.

या समारंभास प्रमुख पाहुण्या म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या बोर्ड मेंबर वर्षा प्रशांत ठाकूर व महिला उत्कर्ष समितीच्या अध्यक्ष डॉ. स्मिता पाटील लाभल्या. शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, शाळा समिती सदस्य सुरेश पाटील, सुनील पाटील व पालक–शिक्षक संघटनेचे पालक प्रतिनिधी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले मान्यवरांनी, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.









# वीरशैव लिंगायत समाजाचा वधू–वर पालक परिचय मेळावा

**उरण : बातमीदार**

गळ्यात इष्टलिंग, कपाळाला भस्म व भगवान शिवाला आराध्य दैवत मानणारा, शैव संस्कृतीचे आचरण, पालन करणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र वीरशैव सभा ठाणे जिल्हा समिती व वीरशैव लिंगायत सेवा संस्था ठाणे या सामाजिक संस्था कार्यरत असून या दोन्ही संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२९) सकाळी १०.३० वाजता धर्मवीर आनंद दिघे सभागृह,गांधी नगर चौक, डोंबिवली (पूर्व), मुंबई येथे वीरशैव लिंगायत धर्मातील सर्व जाती पोट जातीतील इच्छुक वधू वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाचे वधू वर मेळाव्याचे ३५ वे वर्ष आहे. इच्छुक वधू वरांनी नाव नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी उपाध्यक्ष बसवंतराव अळगी (९६६४१४२४१२, ९८२००६१३६२) यांच्याशी संपर्क साधावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राम कृष्ण हरी ग्रुपची अनोखी सफर

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

सेवानिवृत्त प्राचार्य सुरदास राऊत, नाथा नाईक, दिलीप पाटील, अरुण घाग व इंजिनिअर बाळकृष्णा पाटील यांचा राम कृष्ण हरी या ग्रुपच्या नावाने एक अनोखी सफर २६ नोव्हेंबर २०१९ ते १२ डिसेंबर २०२४ अशी एकूण १७ दिवसांची भारतातील पूर्व व दक्षिणेकडील विविध राज्यांतील ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, औद्योगिक ठिकाणांना भेटी देऊन या ग्रुपच्या सदस्यांनी निवृत्तीनंतर जीवनाचा मुक्त आनंद लुटण्याचा प्रयत्न केला.

प्रवासाची सुरुवात रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेरच्या महागणपतीचे दर्शन घेऊन प्रवासात सुरुवात केली. महाराष्ट्रातील घृष्णेश्वर महादेव मंदिर, पोहरादेवी, रेणुका माता मंदिर (माहूरगड) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्प, छत्तीसगड मधील भिलाई लोहपोलाद कारखाना, मैत्री बाग, मल्हारगड, झारखंड मधील बाबा वैद्यनाथ (देवधर) बासुकींनाथ



धाम. बिहारमधील गया, बोध गया, श्री विष्णू पद वेदी धाम.पश्चिम बंगालमधील गंगासागर, वेलूर मठ, विक्टोरिया मेमोरियल, हावडा ब्रिज, कालीमाता मंदिर, दक्षिणेश्वर काली माता, कोलकत्ता पोर्ट, हल्दीया पोर्ट, ईडन गार्डन, अंडरग्राउंड मेट्रो प्रवास, ओरिसामधील कोणार्क सूर्य मंदिर, चंद्रभागा बीच, गोल्डन बीच,जगन्नाथ पुरी, लिंगराज मंदिर, तारातारीणी माता मंदिर. आंध्र प्रदेशातील वराहनृसिहस्वामी मंदिर, कनका दुर्गामाता मंदिर. तेलंगणा मधील रामोजी फिल्म सिटी, चारमिनार, श्री शैल्यम मल्लिकार्जुन महाराष्ट्रातील अक्कलकोट मोरगाव जेजुरी मार्गे परतीचा प्रवास असा एकूण जवळजवळ ६००० कि.मी. एकूण सतरा दिवसांचा फोर व्हिलरने प्रवास करत एकदाही हॉटेलमध्ये कुठलाही पदार्थ न खाता सर्व साहित्य सोबत घेऊन सर्वांच्या परस्पर सहकार्याने जेवण तयार करून एक वेगळा अनुभव घेतला.

१० राज्यांतील प्रवास करून त्या त्या राज्यातील संस्कृतीचा अभ्यास करून प्रवासाची सांगता १२ डिसेंबर रोजी पूर्ण करण्यात आली. या संपूर्ण प्रवासाचे नियोजन सुरदास राऊत सरांनी वेळोवेळी व्हॉट्सअॅप ग्रुपवर चर्चा करून केली व इतर सर्वांनी प्रवासाची रूपरेषा आखून प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला.

## निवडक

### श्री दत्त मुखवटा पालखी सोहळा



**रेवदंडा :** चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त जयंती परंपरेने उत्साहात साजरी केली जाते. यानिमित्त चौल पाठारे क्षत्रीय पाचकळशी माळी समाजाचे वतीने श्री दत्त मुखवटा पालखी सोहळा झाला. चौल पाठारे क्षत्रीय माळी समाजाचे वतीने गेली शंभर वर्षांच्या परंपरेने चौल भोवाळे श्री दत्तण जयंतीच्या दिवशी सकाळी श्री दत्तस मुखवटा पालखी सोहळयांचे आयोजन करण्यात येते. सुरेश घरत कोटकर, रमेश म्हात्रे, प्रवीण राऊत, अनंत घरत, वामन घरत, प्रपुल्ल मोरे, बलराम नाईक, मधुसुदन नाईक, नरेश म्हात्रे, सचिन कोटकर, विनोद कोटकर, सुभाष कोटकर, राकेश बेडेकर, बलराम म्हात्रे, अशोक घरत, उदय नाईक, संजय काबाळे, प्रवीण घरत, संजय नाईक आदी उपस्थित होते.

### कोलाड नाभिक तरुण संघाची बैठक

**धाटाव :** कोलाड नाभिक तरुण संघाची बैठक समर्थ नगर आंबेवाडी येथे मोठ्या उत्साहात झाली. या बैठकीत नाभिक तरुण संघाची नवीन कमिटी स्थापन करण्यात आली. निलेश खंडागळे यांची सर्वानुमते विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर कोलाड शहर अध्यक्षपदी किरण खराडे यांनी निवड केली. कार्याध्यक्ष प्रवीण पवार, उपाध्यक्ष यशवंत मोहिते, सचिव चंद्रकांत हुजरे, खजिनदार उत्तम साळुंखे यांची निवड करण्यात आली. या सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### चेतन पाशिलकरला सुवर्णपदक



**पाली :** सुधागड तालुक्यातील पालीजवळील तळई या दुर्गम भागात डोंगर वस्तीत वसलेल्या गावातील आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक विजेता दिव्यांग चित्रकार चेतन पाशिलकरने दिल्लीमधील राष्ट्रीय Abylimpic स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. चेतन पाशिलकर यांची फिनलँड येथे २०२७ साली होणाऱ्या आंतरराष्ट्रीय Abylimpic स्पर्धेसाठी पुन्हा निवड झाली आहे. वेगवेगळ्या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या विविध प्रादेशिक चित्रकला स्पर्धेतही सुवर्णपदके मिळविली होते. चेतन पाशिलकर हे आपल्या पत्नी आणि लहान मुलगा सह ठाणे शहरातील हायल्यांड रेसिडेन्सीमध्ये वास्तव्यास असून ते दिव्यांग तसेच सामान्य विद्यार्थ्यांसाठी चित्रकला प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिरेही घेतात. चेतन पाशीलकर हे मुख आणि कर्णबधिर असूनदेखील ते स्वतः लहान मुलांना पेंटिंगचे ज्ञान देत आहेत.

# रेवदंडा एसटी आगारात अपघाताचा धोका

## आवारात खड्डेच खड्डे आणि अनधिकृत वाहने पार्किंग स्टॅण्ड





**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रवासीवर्गाचे जिव्हाळयाचे असलेले रेवदंडा एसटी बसस्थानक आवारात पडलेले मोठे खड्डे व स्थानकांच्या आवारात बेशिस्तीने केलेली वाहन पार्किंग यामुळे अपघातास निमंत्रण ठरते. भविष्यात आवारात सर्वत्र पडलेले मोठे खड्डे व बेशिस्त अनाधिकृत वाहने पार्किंग स्टॅण्ड यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता संभवते.

रेवदंडा एसटी बसस्थानक अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे, नित्याने तिन्ही तालुक्यात येथून एसटी बसेस जा-ये करत असतात. येथूनच मुंबई, पुणे, ठाणे, शिर्डी, आदी महाराष्ट्रात मुरूड एसटी डेपोच्या दुरवर जात असलेल्या एसटी बसेस थांबा आहे. या एसटी बसस्थानकात प्रवासीवर्ग व स्थानिकांचे वर्दळ असल्याने नित्याची गर्दी आढळते. रेवदंडा एसटी बसस्थानक आवारात पावसाळयात मोठे मोठे खड्डे निर्माण झाले होते, या खड्डात पावसाळयात पाणी साचून तळी निर्माण झाली होती. सध्या पावसाला नसल्याने खड्डयात पाणी नाही, मात्र भले मोठे खड्डे तसेच आहेत. स्थानकांच्या आवारात एसटी बसेस ये-जा करत असताना या ड्डाने बसेसमधील प्रवाशाना धक्का बसतो तसेच खड्डे चुकविताना वाहनचालकांचीसुद्धा भंबेरी उडते. या वेळी स्थानकांच्या आवारातील प्रवासीवर्ग अथवा स्थानिक यांना बसेस चालकांचे खड्डे चुकविण्याचे प्रयत्नात धक्का लागून अपघात होण्याची निश्चित शक्यता संभवते. त्यामुळे भविष्यात एसटी स्थानकांचा आवारात खड्डे चुकविताना अपघातास निमत्रंण ठरत आहे. शिवाय एसटी स्थानक आवारात बेशिस्तीने लहान मोठी वाहने अनधिकृतपणे पार्किंग नित्याची असते. या अनधिकृत पार्किंगने एसटी बसेस ये-जा करताना अडथळा होत असतो. खड्डे व बेशिस्त पार्किंग यामुळे रेवदंडा एसटी बसस्थानकात निश्चितपणे अपघातास निमत्रंण ठरत आहे.

बसस्थानक आवारातील रस्ता संबंधितांनी पुनस्यः करावा, अशी मागणी पावसाळ्यापासून प्रवासीवर्ग करत आहेत, मात्र संबंधित बसस्थानक आवारातील रस्त्याची दुरवस्था दुर्लक्षित करत असल्याने प्रवासीवर्ग व स्थानिक ग्रामस्थ संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

## मोर्बा येथे क्रीडा, व्यक्तिमत्व विकास स्पर्धा



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद अलिबाग नियोजित तालुक्यातील साई बीटाच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा मोर्बा येथे शुक्रवारी (दि.१३) झाल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन शौकत रोहेकर सरपंच मोर्बा व खालिद अहमद खान मुख्याधपक एस. एस. मोर्बा हायस्कूल मोर्बा यांनी केले.

कार्यक्रमास विस्तार अधिकारी धुळदेव कोळेकरव धोंडीराम सूर्यवंशी केंद्रप्रमुख दहिवली. झहूर बंदरकर केंद्र प्रमुख मोर्बा उर्दू संजय पाटोळे, राजेश इवलेकर, मुख्याध्यापक मोहन साळी मुख्याध्यापक मॉडर्न इंग्लिश स्कूल मोर्बा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सर्व मान्यवर व साई बीटातील सर्व शिक्षक स्पर्धक, विद्यार्थी, पालक वर्ग यांचे स्वागत शब्दसुमनानी सतीश डेपे यांनी केले. विस्तार अधिकारी कोळेकर यांनी शिक्षक पालक, विद्यार्थी यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या सर्व स्पर्धांमध्ये साई बीटातील सर्व शाळांनी सहभाग नोंदविला विस्तार अधिकारी कोळेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सुनियोजित नियोजनामुळे सर्व स्पर्धा उत्साही वातावरणात झाल्या.

संपूर्ण खेळाचे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नियोजन व परीक्षक चिकणे, देवरे, प्रिया उभारे, कादंबरी कडू, बंडगर, लाड , रुबीना दाखवे, आईशा राऊत यांचे नियोजन आयोजन व परीक्षक म्हणून मोलाचे सहकार्य लाभले. खान सर यांच्याकडून बक्षीस म्हणून विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी देण्यात आली. अतिशय आनंदी व उत्साही वातावरणात झालेल्या या स्पर्धेसाठी साई बीटातील सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांनी कवायतींमधून उभारले मनोरे



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने वार्षिक क्रीडा महोत्सवात सुधाकर शिपुरकर, गणेश वाघरे आणि मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी चपळतेसह संतुलन साधत अचुकता दाखवून चित्तथरारक अनोखे मानवी मनोरे उभारले.

कसलेल्या सरावतून चमकदार कवायती आणि कसरती पाहून क्रीडा रसिकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम ही शैक्षणिक संस्था नेहमीच एक पाऊल पुढे असते. त्याचाच अनुभव आणि प्रत्यय संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे आणि क्रीडा महोत्सवाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र सिमलेस कंपनीचे उप व्यवस्थापक के.के. पांडे यांना आला.

या कवायतींमध्ये पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. रंगीबेरंगी आकर्षक वेशभूषा आणि विविध खेळांच्या साहित्य वापरून विद्यार्थ्यांनी अशोक दादा साबळे शाळेचे मैदान सर केले. प्रत्येक मनोरा आणि कसरती सादर केल्यानंतर खेळाडूंना मान्यवरांसह विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत आणि कौतुक केले जात होते.

सुरुवातीला राष्ट्र गीत आणि क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर क्रिडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. या महोत्सवात सुमारे ५०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या संस्थेच्या खेळाडूंनी राष्ट्रीय, राज्य आणि विदेशात उल्लेखनीय कामगिरी करून आपल्या शाळेचे नाव उज्वल केले आहे.

## नऊ शाळांमध्ये लेखन स्पर्धा

### बळवंत वालेकर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम



**नागोठणे : प्रतिनिधी**

अलिबाग येथील ज्येष्ठ पत्रकार तथा अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बळवंत वालेकर सर यांच्या वाढदिवसानिमित्त १२ डिसेंबर रोजी संस्थेने नऊ शाळांतील विद्यार्थ्यांच्या लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. इयत्ता तिसरी - चौथी आणि पाचवी अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा घेण्यात झाली. या स्पर्धेत ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेत तिसरी - चौथीच्या गटात सान्वी देवेंद्र बंदरी -प्रथम (शिशुविहार प्राथ. शाळा अलिबाग), जान्हवी रुपेश थळे - द्वितीय (प्राथ. शाळा वढाव), यज्ञिका संतोष नाईक - त्रुतीय (प्रा. शाळा भोवाळे), इयत्ता - पाचवी अर्णव अनंत घरत - प्रथम (प्राथ. शाळा भाल),

गार्गी हेमंत कोतवडेकर- द्वितीय (प्राथ. शाळा भाल) उत्तेजनार्थ - काव्या भरत मानकोले (प्राथ. शाळा पवेळे), काव्या किरण भोईर (प्राथ. शाळा भोवाळे) हे विद्यार्थी पारितोषिक पात्र ठरले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पारितोषिक व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, ज्येष्ठ पत्रकार जयंत धुळप, संस्थेचे संचालक तथा माजी नगरसेवक सुकुमार भगत, ॲड. प्रमोद पाटील, माजी नगरसेवक बाळूशेट शेट्ये, आर. सी. इफचे निवृत्त अधिकारी जीवन कुलकर्णी, भोवाळे प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक विजय नांदगावकर, कार्ले प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक गुलाबराव काळे, वढाव शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी राऊत, उसर शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी दराडे, लोणारे शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील, जांभूळपडा शाळेचे मुख्याध्यापक सिताराम जाधव, विलास पनासे, रुपा कोळी, दक्षता नागे (भाल) आदिंसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

## मध्य रेल्वेची वाहतुकीसह उत्पन्नात उल्लेखनीय वाढ

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात नोव्हेंबर २०२४पर्यंत प्रवासी वाहतूक आणि उत्पन्नात उल्लेखनीय वाढ केली आहे. मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात प्रवासी भाड्यातून ४,९६६ कोटी रुपये मिळवले आहेत. जे मागील वर्षी याच कालावधीत ४,६९९ कोटी रुपये होते. अशा प्रकारे ५.६८ टक्क्यांची वाढ झाली आहे.

यामध्ये नोव्हेंबर-२०२४पर्यंत गैर-उपनगरीय उत्पन्नाच्या मार्गाने ४,३२८ कोटी रुपयांचा समावेश आहे, जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४,०९५ कोटी रुपये होता जो नोव्हेंबर-२०२४ पर्यंत उपनगरीय उत्पन्नाच्या मार्गाने ५.६९ टक्के आणि ६३८ कोटी रुपयांनी वाढला आहे. मागील वर्षी याच कालावधीतील ६०४ कोटी रुपयांच्या तुलनेत ५.६३ टक्क्याने वाढ झाली आहे.

प्रवासी संख्येच्या बाबतीत, मध्य रेल्वेने या आर्थिक वर्षात नोव्हेंबर-२०२४ पर्यंत १०६४ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली होती, जी मागील वर्षी याच कालावधीत १०३९ दशलक्ष प्रवाशांच्या तुलनेत २.३५ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. यामध्ये या आर्थिक वर्षात १२७ दशलक्ष गैर-उपनगरीय प्रवाशांचा समावेश आहे, गेल्या वर्षीच्या १२१ दशलक्ष गैर-उपनगरीय प्रवाशांच्या तुलनेत ५.६१ टक्के वाढ झाली आहे.

यामध्ये या आर्थिक वर्षात ९३६ दशलक्ष उपनगरीय प्रवाशांनी प्रवास केला आहे, गेल्या वर्षी ९१८ दशलक्ष उपनगरीय प्रवाशांनी प्रवास केला होता. उल्लेखनीय म्हणजे, एकट्या नोव्हेंबर २०२४ मध्ये मध्य रेल्वेने १३८ दशलक्ष प्रवासी (१२२ दशलक्ष उपनगरी आणि १६ दशलक्ष गैर-उपनगरीयांसह) प्रवास केला आणि ५५४ कोटी रुपयांचा महसूल मिळवला (८४ कोटी रुपये उपनगरीय उत्पन्न आणि ४७० कोटी गैर-उपनगरीय उत्पन्नाचा समावेश आहे).

## वावर्ले केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा



**चौक : प्रतिनिधी**

पंचायत समिती खालापूर शिक्षण विभाग गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमले, केंद्रप्रमुख गोविंद दरवडा यांच्या मार्गदर्शनाखाली वावर्ले केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा रायगड जिल्हा परिषद शाळा बोरगाव खुर्द येथे आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेचे उद्घाटन सरपंच प्रितेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये वावर्ले केंद्रातील १९ शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. इयत्ता १ ली ४ थी छोटा गट, व इयत्ता ५ वी ते ७ वी मोठा गट अशी विभागणी करण्यात आली होती. वैयक्तिक व सांघिक खेळ लंगडी, लगोरी, बेचकीने नेम धरणे, दोरी उड्या, शिल्पकाम, पारंपारिक नृत्य, पथनाट्य व समूहगीत असे व्यक्तिगत विकासाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेसाठी वावर्ले केंद्रातील शिक्षकांनी पंच व गुण लेखकाचे काम पाहिले. योग्य नियोजन करून खेळीमेळीच्या वातावरणात स्पर्धा झाल्या. सर्व विजेत्या संघांना व स्पर्धकांना केंद्रप्रमुख गोविंद दरवडा, मुख्याध्यापक राठोड व वावर्ले केंद्र शाळेच्या मुख्याध्यापक संगीता जाधव, आंतरराष्ट्रीय वेट लिफ्टींग बबन झोरे या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

विजेत्या स्पर्धकांना सरपंच प्रितेश मोरे यांच्याकडून स्व खर्चाने चषक स्वरूपात पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित मिडगुले यांनी केले तर आभार संदीप काइनकर यांनी मानले.

# केंद्रीय क्रीडा आणि व्यक्तिमत्व कार्यक्रमाची सांगता





**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती शिक्षण विभाग खालापूर यांच्या आदेशाने कारगाव केंद्राच्या दोन दिवसीय क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, त्याचा सांगता समारोप गट शिक्षण अधिकारी यांच्या हस्ते झाला.

१२ व १३ डिसेंबर रोजी क्रीडा स्पर्धा रायगड जिल्हा परिषद शाळा तुरमाळ तर व्यक्तिमत्व स्पर्धा रायगड जिल्हा परिषद शाळा कारगाव येथील कोयना रत्न कै, कृ. ना मुसळे सभागृहात पार पडल्या. कारगाव केंद्रात बहुतेक शाळा ह्या दुर्गम भागात येत असून येथील सर्व शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता,यात प्रामुख्याने लगोरी, बेचकीने नेम धरने, गायन, नृत्यकला होते, या स्पर्धेत क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत अनेक विद्यार्थांनी सहभाग घेऊन प्रथम दृतीय आणि तृतीय क्रमांक क्रमांकांचे पारितोषिके पटकविले, या सर्व विजेत्या शाळा आणि विद्यार्थ्यांना गटशिक्षण अधिकारी कैलास चोरामले यांच्या हस्ते पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या दोन दिवसीय स्पर्धा अतिशय उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या.

या क्रीडा स्पर्धेत जिल्हा पंच म्हणून शिक्षक हरिश्चंद्र साळुंखे यांनी काम पाहिले.

या वेळी शिक्षक हरिश्चंद्र साळुंखे, मधुकर बैसाणे, गजानन राऊत, संजय जाधव, तूरमाळ शाळेचे मुख्याध्यापक सुनील पांगारे, कारगाव शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुर्गे,सुधीर घोडके सचिन पाटील, सागर रणदिवे, प्रवीण माडेवार, विनोद नारगुडे, संजय राठोड, ज्ञानेश्वर चाटे, मोहन दहिफळे, प्रवीण खंडागळे, सुनीता झावरे, स्वाती मुसळे, रोहिणी भंडारे, सोहाली सातूनकर, गारमाळ शाळेच्या मुख्याध्यापिका सविता दारशेवाड, रुपाली मोडक, श्वेता घोसाळकर, आरती जाधव आदिसह तसेच तुरमाळ ग्रामस्थ,कारगाव ग्रामस्थ शिक्षक, ग्रामपंचायत यांनी विशेष मेहनत घेतली.

## पोलादपुरात मालमत्ता कराबाबत बैठक



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीने अकारण वाढवलेल्या मालमत्ता कराच्या नोटीसांमुळे पोलादपूरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या मालमत्ता कर वाढीविरोधात कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहात नागरिकांची सभा आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये उपस्थित नागरिकांनी वाढीव घरपट्टीच्या निर्णयाला ठाम विरोध दर्शवला आणि या संदर्भात पोलादपूर नागरी तक्रार निवारण मंच स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

या वेळी उपस्थित तज्ज्ञांनी कायदेशीर मार्गांची माहिती दिली आणि नगरपंचायतीकडे हरकत नोंदवण्यासाठी नागरिकांना हरकत अर्जाचा नमुना देण्यात आला. सभेत घरपट्टी वाढीबाबतच्या विविध तक्रारींवर चर्चा करून नागरिकांना पुढील मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय हरकती दाखल करून आपल्या अधिकारांसाठी संघटित होण्याचे आवाहन करण्यात आले.

नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता, या लढ्याला व्यापक पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# भारताने फॉलोऑन टाळला

## चौथ्या दिवसाखेर ९ बाद २५२ धावा

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध गाबा कसोटीत भारताची टॉप फलंदाजी ऑर्डर फेल ठरली, परंतु जडेजा-केएल राहुल आणि बुमराह-आकाशदीप यांच्या भागीदारीमुळे भारताने फॉलोऑनचा धोका टळला आहे.



ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात फलंदाजी करताना ४४५ धावांचा डोंगर उभारला होता. भारताने फॉलोऑन टाळल्यानंतर खराब सूर्यप्रकाशामुळे चौथ्या दिवसाचा सामना थांबवण्यात आला. भारताने ९ बाद २५२ धावा केल्या आहेत. यासह ऑस्ट्रेलियाकडे अजूनही १९३ धावांची आघाडी आहे. बुमराह १० धावा आणि आकाशदीप २७ धावा करून नाबाद परतले आहेत.

चौथ्या दिवशी भारताची नववी विकेट रवींद्र जडेजाच्या रूपाने पडली, तेव्हा भारताची धावसंख्या ९ बाद २१३ धावा होती. फॉलोऑन वाचवण्यासाठी भारताला ३३ धावांची गरज होती. भारताने फॉलोऑन टाळला नसता तर ऑस्ट्रेलियन संघ भारताला पुन्हा फलंदाजीसाठी पाचारण करू शकला असता, पण जसप्रीत बुमराह आणि आकाशदीपने तसे होऊ दिले नाही. भारताच्या गोलंदाजांनी टीम इंडियाला परत संकटातून बाहेर काढले. जसप्रीत बुमराह आणि आकाशदीपने १०व्या विकेटसाठी आतापर्यंत ५५ चेंडूत ३९ धावांची भागीदारी रचली आहे. योग्य चेंडूंवर फटकेबाजी आणि बचावात्मक फलंदाजी करत या दोन्ही गोलंदाजांच्या फलंदाजी कौशल्याने सर्वच चाहत्यांना प्रभावित केले.

# रायगडचे १४ धनुर्धर करणार महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

**अलिबाग : प्रतिनिधी**

फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ रायगडच्या यजमानपदाखाली आयोजित करण्यात आलेली १४वी महाराष्ट्र राज्य फिल्ड इनडोअर धनुर्विद्या निवड चाचणी अलिबाग नेहुली येथील स्पर्धा रायगड जिल्हा क्रीडा संकुलात झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १४ धनुर्धरांची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. निवड झालेले सर्व धनुर्धर लखनऊ येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण समारंभ दत्ताजीराव खानविलकर ट्रस्टचे अध्यक्ष अमर वार्डे यांच्या हस्ते झाला.

जिल्ह्यातील १४ धनुर्धरांची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. यामध्ये १०





वर्षाखालील वयोगटात मुलींमध्ये रूधिरा जाधव, स्वाहा कदम, क्षितिका कदम, मुलांमध्ये अर्जुन म्हात्रे व अभिमन्यू मिश्रा या पाच धनुर्धरांनी कौशल्य सिद्ध करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपले तिकीट पक्के केले आहे. १४ वर्षाखालील वयोगटात मुलींमध्ये तनिषा वर्तक, मुग्धा वैद्य, सई पिळणकर, तर मुलांमध्ये आशय आंग्रे, दिव्यनिल दत्ता, अंश पराडकर, आरव हुलवान आणि अथर्व पाटील या धनुर्धरांनी प्रतिस्पर्ध्यांना मत देत पदकाला गवसणी घातली. हे धनुर्धर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

वरिष्ठ वयोगटात लाभेश तेली या धनुर्धराने प्रतिस्पर्धी खेळाडूंवर पाळ्या अचूक नेमबाजीने मात केली. यामुळे लाभेशचीही राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या धनुर्धरांना फिल्ड आर्चरी असोसिएशन महाराष्ट्र अध्यक्ष सीताराम चव्हाण, महासचिव सुभाषचंद्र नायर, उपाध्यक्ष रितिका नायर, फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ रायगडचे सचिव संतोष जाधव, मिलिंद पांचाळ, वैभव सागवेकर, अजिंक्य अडकर यांचे मार्गदर्शन लाभले.




# राज्यस्तरीय मास्टर्स गेम्समध्ये रायगडचे खेळाडू चमकले

**उरण : बातमीदार**

पाचवी महाराष्ट्र राज्यस्तरीय मास्टर्स गेम्स ही स्पर्धा नुकतीच नाशिक येथे झाली. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी ठसा उमटवला.



केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष स्नेहल पालकर यांनी ३५ वर्षावरील गटात ८०० मीटर आणि १५०० मीटर धावणे या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले, तर पाच किमी धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक मिळवले. पालकर यांचे सहकारी अमित विचारे यांनी ४० वर्षावरील गटात १५०० मीटर धावणे सुवर्ण, तर ८०० मीटर आणि पाच किमी धावणे यामध्ये रौप्यपदक प्राप्त केले. दिलीप विचारे यांनी ५० वर्षावरील गटात ८०० मीटर आणि १५०० मीटरमध्ये रौप्यपदक मिळवले. अमोल वळसंग (खोपोली) यांनी ३५ वर्षावरील गटात १५०० मीटर आणि १० किमीमध्ये रौप्य आणि पाच किमीमध्ये कांस्यपदक प्राप्त केले. मनीष खवले यांनी ५५ वर्षावरील गटात उंच उडीमध्ये सुवर्ण, तर लांब उडीत कांस्यपदक मिळवले. या सर्व खेळाडूंची निवड मार्च महिन्यात ओडिशा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.







